म. ग्र. सं. वाचनालय, ठाणे
विषय : का वा
दा. क्र. : १२८८५

IRBK-0112745
IRBK-0112745

[redacted]ला : पुष्प दुसरे

# ध्येयनिष्ठांच्या कथा


लेखक

श्री. कृ. पं. देशपांडे, एम्. ए., बी. एड्.,

अध्यापक, महाराष्ट्र विद्यालय,

पुणे २.



IRBK-0112745


प्रस्तावना

…ा. बोधनी, एम्. …, एम्. एड्.,

मुख्याध्यापक, नू. म. वि. मुलींची प्रशाला,

पुणे ९

मूल्य : दोन रुपये व पंचवीस पैसे

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन
प्रथमावृत्ति : सन १९६९

☆ ☆ ☆ सन १९६९

अन्तर्गत चित्रे : श्री. म. सोवनी
कव्हर चित्र : श्री. वि. शं. पाथरकर

☆ ☆ ☆

शनिवार, दिनांक : ८ मार्च सन १९६९
फाल्गुन वद्य पंचमी : 'रंगपंचमी' शाके १८९०
रंगपंचमी १८९०

☆ ☆ ☆

मुद्रक :
न. शं. कुलकर्णी,
टीचर्स प्रिंटिंग प्रेस,
स. नं. ७२०चा २०,
नवी पेठ, पुणे ९.

२१०१

# प्रस्तावना

'ध्येयनिष्ठांच्या कथा' हे अभिनव मार्गदर्शक मालेमधील दुसरे पुस्तक अनघड कुमार-मनावर सुयोग्य संस्कार करण्याचा लेखकाचा व प्रकाशकाचाही हेतु सुस्पष्ट दिसतो.

या पुस्तकात एकलव्य, पुष्यमित्र, राणा प्रताप, विठ्ठलराव शिंदे आणि दादासाहेब फाळके या ध्येयनिष्ठांच्या कथा समाविष्ट आहेत. काळाच्या दृष्टीने विचार करिता या छोटयाशा पुस्तकाला महाभारतकालापासून ते विसाव्या शतकापर्यंतची अति भव्य चौकट लाभलेली आहे. श्री. कृ. पं. देशपांडे यांनी आपल्या पहिल्या पुस्तकातही–'मानवतेच्या कथा'–हेच धोरण अवलंबिलेले दिसते.

या कथा सांगताना लेखकाला जे सांगावयाचे आहे, त्यात तळमळ आहे. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' असे त्याचे स्वरूप आहे.

**ज्या कुमारांच्या हातात हे पुस्तक जावयाचे आहे, त्यांचे मन 'विचार' आणि 'आचार' यांचा आकार घेत असते. अशा वेळी या कथा त्यांनी वाचाव्यात व त्याद्वारे त्यांच्या संस्कारक्षम मनावर एक ठसा उमटावा ही अपेक्षा आहे. मला वाटते या बाबतीत लेखकाचा हेतू साध्य झाला असावा. ज्या सुविचाराकडे कुमारांचे लक्ष खेचले जावे अशी लेखकाची अपेक्षा आहे, त्या सुविचारांची रंगीत छपाई करून प्रकाशकानेही साथ दिली आहे.**

या सर्व कथा जरी ध्येयनिष्ठांच्या असल्या तरी त्यातही ध्येय-निष्ठेच्या विविध पैलूंचे दर्शन घडविले आहे. ध्येयनिष्ठेचा आदर्श, ध्येयनिष्ठेचा पीळ, ध्येयनिष्ठेचा मानदंड, ध्येयनिष्ठेची पूर्तता, ध्येयनिष्ठेची तळमळ, या नावावरून त्याची प्रचिती येते.

एकलव्याची कथा ही दुहेरी अर्थाने विचार करणारी आहे. विद्येसाठी जातीचे बंधन नसावे, ध्येयनिष्ठ विद्यार्थ्याने प्रतिकूल परिस्थितीत आणि मनाला डंख झालेला असताही गुरुजनाबद्दल जी निष्ठा व्यक्त केली आहे, ती अपूर्व आहे. त्याचा त्यागही अतुलनीय आहे. आजच्या असतुष्ट व प्रक्षोभक विद्यार्थीमनाला या कथेमुळे थंडगार शिडकावा मिळावा.

स्वातंत्र्यरक्षणाचे कार्य किती बिकट, किती कटु व किती कठोर असते; याची साक्ष पुष्यमित्राची कथा तुम्हांस देईल परंतु आजच्या लोकशाही युगात बहुमताचा मान राखणे व कायद्याने प्रस्थापित

झालेले राज्यशकट चालविणे हे अग्रक्रमाचे कार्य आहे. पुष्यमित्राच्या काळी राज्यव्यवस्था भिन्न प्रकारची होती. राज्यव्यवस्थेची ही दोन्ही स्वरूपे चिरंतन ध्यानांत ठेवून या कथेकडे पाहावे.

राणाप्रतापची कथा ही भावपूर्ण आहे. एका पराक्रमी सम्राटाला आपल्या छोटया मुलीची भूक शमविता येऊ नये, हा दैवदुर्विलास आहे. तेथे तोही क्षणभर आपल्या ध्येयापासून ढळू लागतो. पण तो तोल त्याची सम्राज्ञी पद्मावती सावरते. राणा प्रतापाला ज्या विचाराने झाकाळून टाकले होते; त्या विचारांची मळभे दूर जाऊन प्रतापचा प्रतापी-सूर्य परत तेजाने न्हाऊन निघाला. असे प्रसंग राज्यकर्त्यांवर येत असतात. आजचे कुमार दहा-पंधरा वर्षांनी या लोकशाही राज्यशकटाची विविध स्थाने विभूषित करणार आहेत. त्यांना ही कथा प्रेरणा देईल. तसे जर घडले तर श्री. कृ. पं. देशपांडे यांना अतीव समाधान होईल. ते कदाचित म्हणतील, याचसाठी केला होता हा अट्टाहास.

विठ्ठलराव शिंदे यांची कथा, आज अडचणींचा पाढा सतत वाचणाऱ्या विद्यार्थ्याला दिशा दाखविण्यास समर्थ आहे. वास्तविक पाहाता आजचा विद्यार्थी विठ्ठलराव शिंदे यांच्या काळापेक्षा खूपच अनुकूल वातावरणात विकसित होत आहे. तरीसुद्धा किरकोळ कारणानी प्रक्षुब्ध होणाऱ्या मनाला लगाम घालण्याचा हेतु या कथेने साध्य होईल, असे वाटते.

दादासाहेब फाळके यांची कथा स्वतंत्र उद्योगाच्या शोधात असणाऱ्या नवयुवकाला प्रेरक होईल. एकाच चाकोरीतले जीवन व्यतीत करण्यापेक्षा काही तरी नवीन करण्याचा हव्यास, नवीन क्षेत्र शोधण्याचा चौकसपणा, त्यासाठी सोसावा लागणारा शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रास यांचे स्वरूप स्पष्ट करणारी ही कथा आहे.

श्री. कृ. पं. देशपांडे यांच्या ध्येयनिष्ठांच्या कथांचे स्वरूप हे असे आहे. त्यांच्या या अभिनव मार्गदर्शक मालेला सुयश लाभो ही सदिच्छा.

डेक्कन जिमखाना पुणे ४.<br>
दिनांक : ८-३-१९६९

— प्र. वा. बोधनी

# लेखकाचे निवेदन

'अभिनव मार्गदर्शक माले'तील दुसरे पुस्तक 'ध्येयनिष्ठांच्या कथा' आज कुमारांच्या हाती मी देत आहे. पहिल्या पुस्तकात, आजच्या काळात मानवता धर्माची नितांत आवश्यकता असल्याने, मानवतेचा ठसा उमटविणाऱ्या कथा सांगितल्या होत्या. मानवता कळल्यानंतर, 'मानव' म्हणून जगायला लागल्यानंतर आपल्या डोळ्यासमोर ध्येय ठेवणं आवश्यक आहे.

**ध्येयानेच मानवी जीवनाला गती मिळते. ध्येयानेच मानवी जीवनाची प्रगती होते. भव्य आणि उदात्त ध्येय डोळ्यापुढे ठेवून त्या ध्येयाची पूर्तता झाली, की जीवनाची सांगता होते.**

डोळ्यासमोर ध्येय ठेविल्यापासून ते पूर्णकरण्यापर्यंतच्या वेगवेगळ्या टप्प्यातला आनंद निराळाच असतो. कित्येकदा असंही वाटतं की, ध्येयपूर्तीच्या आनंदापेक्षा ध्येयप्राप्तीतला आनंद श्रेष्ठ असतो. आपणही आपल्यापुढे महान् ध्येय ठेवावं. ते गाठण्याचा प्रयत्न करावा आणि वेगवेगळ्या पायरीवरच्या आनंदाचा आस्वाद घ्यावा, याच हेतूने या पुस्तकातील कथांची गुंफण केली आहे.

या पुस्तकात एकलव्य, पुष्यमित्र, राणा प्रताप, महर्षी शिंदे आणि दादासाहेब फाळके यांच्या कथा घेतल्या आहेत. कथा सांगत असताना त्यांच्या ध्येयनिष्ठेचा ठसा मुलांच्या मनावर उमटावा ही दक्षता घेतली आहे.

* पहिल्या कथेत एकलव्याने धनुर्विद्या प्राप्तीचे व त्यात नैपुण्य संपादन करण्याचे जे ध्येय डोळ्यासमोर ठेवले होते, त्याचा निर्देश आहे. गुरू द्रोणांनी त्याला मार्गदर्शन करण्याचं नाकारलं तरीसुद्धा ज्या जिद्दीनं, तळमळीनं आणि परिश्रमानं त्यानं आपलं ध्येय पूर्ण केलं, ती जिद्द आणि परिश्रम ही निःसंशय कौतुकास्पद आहेत. आपल्याही जीवनात या गुणांचा उपयोग आपल्याला निश्चित करिता येण्यासारखा आहे.

* पुष्यमित्र हा बृहद्रथ मौर्य याचा सेनापती होता. हिंदु राष्ट्राचे-भारतमातेचे-परकीयांच्यापासून रक्षण करणे, तसेच आपले स्वातंत्र्य टिकविणे, हे त्याचे ध्येय होते. ते ध्येय त्याने कसे पूर्ण केले, याची माहिती आपल्याला या कथेत मिळेल.

* राणा प्रताप आपल्याला माहीत आहे. आपली मातृभूमी स्वतंत्र राखण्याकरिता त्याने केलेला त्याग वादातीत आहे. स्वातंत्र्य राखणे व टिकविणे हेच त्याचेही ध्येय होते. अखेर त्याने ते ध्येय पूर्ण केले; पण ते करीत असताना किती हालअपेष्टांना त्याला तोंड द्यावं लागलं, ह्याचे चित्रण या कथेत केले आहे.

तसं पाहिलं तर पुष्यमित्र आणि राणा प्रताप या दोघांचंही ध्येय एकच आहे. तरीही या दोन्ही ध्येयांच्या छटा वेगवेगळ्या आहेत. पुष्यमित्र हा सेनापती आहे. राष्ट्र रक्षणाकरिता त्याने राजालाही जुमानले नाही. आधी राष्ट्र मग राजा, ही त्याची सरळ भावना होती. त्या स्थितीत त्याने ठेवलेले ध्येय हे राणा प्रतापच्या ध्येयापेक्षा थोडे वेगळे वाटते. राणा प्रताप हा स्वतःच राजा आहे. शत्रूने स्वारी करून सर्वस्व नष्ट झालं असताना पुन्हा स्वातंत्र्य मिळविणं, हे त्याचं ध्येय आहे. उलट स्वातन्त्र्यावर आक्रमण आलं असताना स्वातंत्र्य टिकविणं आणि शत्रूने स्वातंत्र्य हिरावून घेतल्यानंतर परत स्वातंत्र्य मिळविणं, एका दृष्टीने शून्यातून विश्व निर्माण करणं, यात जो फरक आहे, तोच या दोघांच्या ध्येयात फरक आहे. थोडक्यात वरवर पाहाता ध्येय जरी एकच दिसलं तरी छटा भिन्न आहेत.

* चवथी कथा महर्षी शिंदे यांची आहे. भरपूर ज्ञान मिळविणे हेच त्यांचे ध्येय होते. अनेक प्रयत्नांनी त्यांनी ते पूर्ण केले. एकलव्य आणि महर्षी शिंदे यांची ध्येयेही वरपांगी एकच दिसतात, नव्हे ती आहेतही. पण त्यातही छोटासा फरक आहे.

एकलव्याने आपल्या ज्ञानार्जनातून व्यक्तीविकास साधला होता. महर्षी शिंदे यांच्या पुढील जीवनाचा प्रवाह लक्षात घेतला तर समाजोन्नतीकरिता ज्ञानप्राप्ती करावी, असा अस्पष्टसा हेतू त्यांच्या मनात असावा असे वाटते.

**ज्ञान हे एक साधन आहे. व्यक्तीविकास, कुटुंबविकास आणि नंतर समाज वा राष्ट्रविकास हे त्यातून साधावयाचे असते.**

एकलव्याने व्यक्तीविकास साधला तर महर्षी शिंदे यांनी समाज विकासाकडे ज्ञानगंगेचा प्रवाह वळविला. अर्थात, कथेपुरते

बोलायचे झाल्यास, त्यांच्या समाजकार्याचा समावेश या कथेत नाही. ज्ञानप्राप्ती हेच त्यांचे ध्येय असून त्यांनी त्याची पूर्तता कशी केली, हाच प्रस्तुत कथेचा विषय आहे.

* पाचवी कथा दादासाहेब फाळके यांची आहे. आपणा सर्वांना माहीत असेल की, भारतात पहिला मूकपट निर्माण केला तो यांनी; पण त्याच्या पलिकडे त्यांच्या जीवनाविषयी तुम्हांला अगदीच अल्प माहिती असेल. येथेही त्यांचे चरित्र नाही; तथापि चित्रपट निर्मिती हे ध्येय डोळ्यासमोर ठेवल्यानंतर त्यांना किती कष्ट सहन करावे लागले, किती संकटांना तोंड द्यावे लागले, आणि कोणत्या परिस्थितीत त्यांना ध्येयपूर्ती करावी लागली, याचे चित्रण या कथेत तुम्हांस आढळणार आहे.

**एकंदरीत, ध्येयनिष्ठांचा मार्ग काटेरीच असतो. हाताला काटे लागल्याशिवाय जसं गुलाबाचं फूल आपल्याला घेतां येत नाही, तसंच ध्येयाचंही आहे. मोठं ध्येय प्राप्त करण्याकरिता असंख्य यातना सहन कराव्याच लागतात. लोखंडाचे चणे खाल्ल्याशिवाय ब्रह्मपदी नाचता येत नाही, हे सारं लक्षात ठेवूनच आपणही ध्येयनिष्ठ बनावं. ते ध्येय प्राप्त करावं, याकरिता या कथा आपल्याला मार्गदर्शक ठरतील अशी आशा आहे.**

पहिल्या पुस्तकातील कथांच्या नावाप्रमाणेच याही पुस्तकातील कथांना नावे देताना, व्यक्तींची नावे दिलेली नाहीत. ती तशी न दिल्यामुळे कथा कोणाविषयी आहे, हे प्रथमदर्शनी समजत नाही; लक्षात येत नाही.

**तथापि या मालेच्या रचनेचा हेतूच ‘ चरित्र ’ सांगणं हा नाही, तर ‘ चारित्र्य ’ सांगणं हा आहे. हे लक्षात घेतलं म्हणजे कथेला व्यक्तीचं नाव का दिलं नाही हे लक्षात येईल. व्यक्तीला महत्त्व नाही, महत्त्व आहे ते त्याच्या ठिकाणी असणाऱ्या गुणांना ! म्हणूनच ध्येयाच्या वेगवेगळ्या छटा ज्या नावातून दिसतील अशी नावे त्या त्या छटा दिसणाऱ्या कथेकरिता दिलेली आहेत.**

शेवटी, हे पुस्तक लिहीत असताना ज्यांचं ज्यांचं सहकार्य

लाभलं, त्यांचा ऋण-निर्देश करणे आवश्यक आहे. नव्हे ते माझे कर्तव्यच आहे. कथा लिहीत असताना ज्या ज्या संदर्भ ग्रंथांची मला मदत झाली, त्या सर्व संदर्भ ग्रंथलेखकांचे मी आभार मानतो.

कामाची घाई असतांनासुद्धा वेळात वेळ काढून प्रा. बोधनी यांनी माझ्या छोटयाशा पुस्तकाला प्रोत्साहनपर प्रस्तावना लिहून दिली, यावद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

आपल्या सिद्धहस्त कुंचल्याने श्री. सोवनी यांनी या सर्व कथांचे प्रसंग साकार केले आहेत, बोलके वनविले आहेत. या त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

माझे प्रकाशक श्री. न. शं. कुलकर्णी यांनी मला नेहमीप्रमाणेच अमोल मार्गदर्शन केले आहे. पुस्तक अधिक उठावदार दिसावे याकरिता, या पुस्तकात महत्त्वाची वाक्ये त्यांनी वेगळया रंगात छापली आहेत. त्यामुळे सजावट अधिक आकर्षक झाली आहे. या बद्दल व त्यांच्या इतर मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे आभार मानतो.


चर्चामंडळाने मला वेळोवेळी जे सहाय्य केले, तसेच ज्या सूचना केल्या, त्यामुळेच पुस्तक अधिक चांगले होऊ शकले. या सहकार्या-बद्दल चर्चामंडळाचे आभार मानून हे निवेदन संपवितो.


१५५ शनिवार पेठ, 'विठाबाई सदन'
पुणे २, दिनांक : ८-३-१९६९

— कृ. पं. देशपांडे

कथानुक्रम.

* ध्येयनिष्ठेचा आदर्श .. १
* ध्येयनिष्ठेचा पीळ ... २३
* ध्येयनिष्ठेचा मानदंड ... ३९
* ध्येयनिष्ठेची पूर्तता ... ५५
* ध्येयनिष्ठेची तळमळ ... ७३


राष्ट्रनिष्ठा
समाजनिष्ठा
कलात्मकता
मानवता
ध्येयनिष्ठा
आज्ञाधारकत्व
धैर्यशीलता
न्यायप्रियता
अभिनव मार्गदर्शक माला
आदर्शत्व



'दान' देऊनी सर्वस्वाचे, कुबेर मी अंतरी।
भ क्ती ची री त च हो न्या री ॥



# ध्येयनिष्ठेचा आदर्श

गुरू द्रोण आणि अर्जुन यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत होतो. समुद्रासारखं मन शांत होतं. डोळ्यात कृतार्थता होती. जीवन धन्य झाल्याचं समाधान होतं. भक्तीच्या पूर्णत्वात जीवनज्योत उजळून निघाली होती. सर्वस्वाचं दान द्यायला लावून कुबेरासारखं मन ठेवायला लावते तीच खरी भक्ती ! मला तो अनुभव मिळाला होता.

माझ्या उजव्या हाताचा अंगठा, गुरूंनी गुरुदक्षिणा म्हणून मागितला. उजव्या हाताचा अंगठा ! धनुर्विद्येचा प्राण ! धनुर्विद्येचं सर्वस्व ! ! पण तो देतानासुद्धा मला किती आनंद झाला म्हणून सांगू ! माझ्यासारख्या व्याधाच्या मुलाजवळ आचार्यांनी स्वतः येऊन गुरु-दक्षिणा मागावी यातच मला सारं मिळालं. सामान्य गोष्ट मागायला स्वर्गानं पृथ्वीवर यावं असं मला वाटलं. आता मला बाण नीट सोडता येणार नाहीत. बाण सोडताना माझ्या हातात विद्युलता कधीच

चमकणार नाही. त्यामुळे कदाचित जग मला श्रेष्ठ धनुर्धर म्हणणार नाही. पण ज्या ज्या वेळी मी धनुष्य हातात घेईन, त्या त्या वेळी मला ध्येय प्राप्तीचा आनंद निश्चित होईल. मी आचार्यांचा शिष्य होतो. त्यांनीच मला धनुर्विद्या शिकविली ही अभिमानाची भावना मनाला निःसंशय शांत करील. आणि ... "एकलव्या! धन्य आहे तुझी. मी धनुर्विद्येचं सार सर्वस्व मागितल्यावरही तू आपला अंगठा तात्काळ मला दिलास. आजपर्यंत मी अनेक शिष्य पाहिले, पण असा ध्येयनिष्ठ आणि आदर्श शिष्य पाहिला नव्हता. जगात, तुला कोणी श्रेष्ठ धनुर्धर म्हणोत किंवा न म्हणोत पण गुरुभक्ती व ध्येयनिष्ठा या तुझ्या गुणांची वाखाणणी चंद्र व सूर्य असेपर्यंत जग करीत राहील. माझा तुला आशीर्वाद आहे." आचार्यांचे हे शब्द माझ्यावर सतत अमृताचा वर्षाव करतील.

* * *

पाच-सहा वर्षांपूर्वी मला कल्पनाही नव्हती की, मी आचार्यांच्या कृपाप्रसादाला पात्र होईन. आचार्य मला शिष्य मानतील. मला धनुर्विद्या चांगली येईल याचं स्वप्नसुद्धा त्यावेळी मला पडलं नव्हतं.

अनेक वेळा माझ्या कानावर आलं होतं की गुरू द्रोण हे कौरव-पांडवांना धनुर्विद्या शिकवितात. त्यांच्यासारखा गुरू आर्यावर्तात सापडणार नाही. अश्वयुद्ध, गजयुद्ध, रथयुद्ध, पदातियुद्ध हे युद्ध-प्रकार आणि शस्त्रास्त्र अध्यापनात त्यांची ख्याती सर्वत्र पसरली होती. अनेक युवराज त्यांच्याकडे अध्यायनाकरिता येत असत आणि अध्ययन करून परत जात असत. मग माझ्या बालमनालाच का वाटू नये की आचार्यांनीच मला धनुर्विद्या शिकवावी? त्यांनीच मला आपलं शिष्य करावं? थोरांच्या संगतीनं थोर होता येतं. फुलाच्या संगतीनं मातीलाही वास लागतो. मलाही थोर व्हावं असं वाटत होतं. मन सारखं आचार्यांच्याकडे ओढ घेत होतं. नदी सागराला

भेटायला आतुर असतेना किंवा भक्त देवाला भेटायला, तसंच माझ्याही मनाचं झालं होतं. एके दिवशी मला रहावलंच नाही. मी माझ्या बाबांना विचारलं–

"बाबा, मला धनुर्विद्या शिकावयाची आहे. शूर व्हायचं आहे."

त्यांनाही खूप आनंद वाटला त्यांनी प्रेमानं मला जवळ ओढलं. माझ्या पाठीवरून हात फिरविला आणि ते म्हणाले–

"धन्य, एकलव्या ! अरे, तुला हे शिकलेच पाहिजे. तू राजाचा मुलगा आहेस. आता मी एका चांगल्यापैकी गुरूंच्याकडे तुला पाठवतो हं !"

"बाबा, आचार्य द्रोण फार चांगले गुरू आहेत. मी बरेच दिवस त्यांची कीर्ती ऐकतो आहे. मला तेच गुरू हवेत. मी त्यांचाच शिष्य होणार. मग, मी जाऊना त्यांच्याकडे ?"

मी बाबांना विचार करायला फुरसतही दिली नाही. त्यांना मी माझ्या शब्दांनी जखडून टाकलं. युद्धात अनेक बाणांनी माणसाला जखडतातना तसे ! पण, बाबांच्या चेहऱ्यावरचे भाव मात्र बदलले होते. मघाच्या आनंदी चेहऱ्याने आता शंकेची जागा घेतली होती. शंकांचे मेघ मुखमंडलाला व्यापू लागले होते. उन्हाळ्याच्या दिवसात दुपारी एकदम ढग येऊन निरभ्र आकाश काळवंडून जावं तसा बाबांचा चेहरा पार बदलून गेला. ते म्हणाले–

"बाळा, एकलव्या, तेच गुरू तुला कशाला हवे आहेत ? आपल्या राज्यात अनेक चांगले गुरू आहेत. मी त्यांना आजच आज्ञा करतो."

"बाबा, मला दुसरे गुरू नकोत. मी आचार्य द्रोणांच्याकडेच जाणार आहे. माझा निश्चय ठरला आहे. मी आजच निघतो त्यांच्याकडे जायला."

माझ्या बालहट्टापुढे त्यांनी नाईलाजाने आणि नाखुशीने मान तुकविली. बालहट्टापुढे मान तुकविणं त्यांना भागच होतं. त्यांच्या

अनिच्छेनेच मी आमचं नगर सोडलं आणि तडक हस्तिनापुराची वाट धरली.

हस्तिनापुर ! कुरूंची राजधानी ! वीरांचं नगर ! आचार्य द्रोण याच नगरात असतात. किती विविध कल्पना माझ्या मनात येत होत्या ! त्या कल्पनांवर आरूढ होऊन माझा मानसपक्षी स्वैर भरारत होता. त्याला एका ठिकाणी जखडून ठेवणं माझ्या हातात नव्हतं. त्याची मला गरजही नव्हती. माझ्या आनंदात मला ती अडचण नको होती.

काही वेळा स्वप्नापेक्षादेखील सत्य सुंदर असतं. रम्य असतं. कुरूंची राजधानी मला तशीच दिसली. मीही राजकुमार होतो पण व्याधांचा ! आमची वस्ती जंगलात होती. घरं मोजकीच होती. राजवाडा असला तरी किती मोठा असणार ? मी जे पाहिलं होतं, अनुभवलं होतं त्यामुळेच कल्पनेत उभी केलेली कुरूंची राजधानी प्रत्यक्षापेक्षा हिणकस होती. गरीबांनी श्रीमंतीची कितीही सुंदर स्वप्नं रंगविली ना,तरी ती प्रत्यक्ष श्रीमंतीपेक्षा कमी प्रतीचीच असतात. तो कल्पनेचाच दुबळेपणा असतो.उत्तुंग कल्पनाशक्तीची झेप घ्यायलादेखील प्रत्यक्षात काहीतरी अनुभव असावाच लागतो.

मी हस्तिनापुरात प्रवेश केला, त्यावेळी सूर्यास्त होत होता. गंगा नदीच्या पांढऱ्या स्वच्छ पाण्यात सूर्याचे रेंगाळणारे किरण मनसोक्त क्रीडा करीत होते. नगराला विळखा घालून गंगा संथपणे मार्ग आक्रमीत होती. अनेक मंदिरांचे कळस आकाशाशी स्पर्धा करीत होते. आत गेल्यावर कुरूंचा संगमरवरी प्रचंड राजवाडा पाहून तर त्यांच्या वैभवाने मी दिपूनच गेलो. असाच सगळ्या गोष्टींचे निरीक्षण करीत करीत मी एका मंदिरापाशी आलो. रात्र होऊ लागली होती. रात्री तेथेच राहून प्रभातकालच्या प्रशांत वेळी आचार्यांची भेट घेण्याचा विचार करून मी तेथेच झोपी गेलो.

सकाळीच मी कुरूंच्या युद्धशाळेकडे चाललो. नगराला जाग आली होती. राजमार्ग गजबजू लागला होता. घोड्यांच्या टापांचे आवाज तालावर पडत होते. माझ्यासारखे अनेक राजकुमार तिकडेच जातांना मला दिसले. मला बरं वाटलं. मीही त्यांच्यात सामावून गेलो.

बऱ्याच वेळानंतर कुरूंची प्रशस्त युद्धशाळा दिसली. आचार्य तेथेच होते. युद्धशाळेचा प्रचंड घेर डोळ्यात मावत नव्हता. महाद्वार प्रचंड होतं. लोखंडाचं होतं. संपूर्ण युद्धशाळेला काळ्या पाषाणांची तटबंदी केलेली होती. आत खड्ग, धनुर्विद्या, गदायुद्ध, अश्वारोहण हे सारे शिकण्याकरिता वेगवेगळी व्यवस्था होती. मी सारं माझ्या नजरेत साठवून ठेवीत होतो. मला या सगळ्या गोष्टींचं दर्शन प्रथमच होत होतं.

सर्व राजकुमारांच्या बरोबर गुरू द्रोणांच्याकडे मी गेलो. अनेक राजपुत्रांचा घोळका त्यांच्या भोवती पडला होता. मी जरा दूरच उभा होतो. माझी नजर त्यांच्याकडे गेली आणि मन नम्रतेनं भारावलं. त्यांची मुद्रा गंगा नदीसारखी शांत होती. हिमालयाप्रमाणे ते भव्य होते. त्यांच्या शुभ्रवर्णी दाढीचे केस थेट पोटापर्यंत आले होते. भव्य आणि रुबाबदार चेहऱ्याला पांढरी वस्त्रे शोभा देत होती. कपाळावर आणि हातावर त्यांनी भस्माचे पट्टे ओढले होते. सर्वांत लक्ष वेधून घेणारे होते, ते त्यांचे डोळे ! आत्मविश्वासाचे प्रचंड तेज त्यांच्या डोळ्यातून ओसंडत होते. हे पाहून नकळत माझे हात जोडले गेले.

आचार्य एकेकाची नावे विचारीत होते. माझ्यावरती वेळ आली. आचार्यांनी माझ्या पाठीवरून प्रेमळपणाने हात फिरविला. मला मूठभर मास चढल्यासारखं वाटलं. त्यांनी मला विचारलं–

“ बाळ ! नाव काय तुझं ? ”

“ एकलव्य.”

" कोणाचा मुलगा तू ? "

" माझ्या पित्याचं नाव हिरण्यधनू. "

माझा आनंद गगनात मावेनासा झाला. " आचार्य.... माझे गुरू...त्यांच्याकडे माझं अध्ययन होणार...त्यांनी मला शिष्य म्हणून पत्करलं आहे...." एक ना अनेक विचार माझ्या आनंदी मनात गर्दी करू लागले. पण दुसऱ्याच क्षणी मी गुरूंच्याकडे पाहिलं. त्यांची चर्या बदलली होती. त्यांच्या चेहऱ्यावर तो शांतपणा नव्हता. ते गांभीर्य नव्हतं. ती सतेजता नव्हती. त्यांनी माझ्याकडे पाहात मला विचारलं –

" म्हणजे, व्याधाचा पोर तू ? "

" होय गुरूजी, माझे बाबाही राजे आहेत. व मी पण राजकुमार आहे. "

" एकलव्या, तू राजकुमार असलास तरी हलक्या जमातीतला आहेस आणि हलक्या जमातीला मी माझी विद्या देणार नाही.

**काजव्याजवळ तेज असलं म्हणून त्याने सूर्याची बरोबरी करू नये.**

जा ! मी तुला शिष्य करू शकत नाही. "

माझे डोळे अश्रूंनी डबडवले होते. सारी पृथ्वी गरगर फिरत आहे, असं मला वाटू लागलं. तरीही मी धीर धरून विचारलं –

" पण गुरुदेव, मला धनुर्विद्या शिकायची आहे. मी काय वाटेल ते कष्ट करीन. आपली आज्ञा शिरसावंद्य मानीन. एक शिष्य म्हणून माझा स्वीकार करावा. माझं ध्येय आहे ते. ते पूर्ण करण्यासाठी मला मार्गदर्शन द्यावं. गुरुदेव,

**गुरुदेव, ध्येयनिष्ठ माणसाला जातीचं बंधन नसावं.**

मी ध्येयनिष्ठ आहे. "

यावर काय बोलावं हे कदाचित् त्यांना न सुचल्यामुळेच ते तटस्थ

[illegible library stamp]

क्रमांक ३५१९ ...... नोंद दि. २.६.९९
उभे असावेत. तथापि त्यांचा चेहरा अनिच्छा दाखवीत होता, त्यात रागाची छटा होती. मला शिष्य करण्याची त्यांची इच्छा नाही, हे स्पष्ट दिसत होतं. पण मलाही दुसरं कोणाचंच शिष्यत्व पत्करायचं नव्हतं. अनिच्छेने त्यांनी मला विद्या शिकवावी असंही मला वाटेना.

**अनिच्छेने शिकविलेली विद्या पूर्णरूपाने कधीच प्राप्त होत नसते.**

एका निमिषात मी विचार केला आणि दुसऱ्या क्षणीच मी त्यांना म्हटलं,

"गुरुदेव, मनानं मी आपलं शिष्यत्व पत्करलं आहे. आपण मला शिष्य म्हणा किंवा न म्हणा !"

त्यांना कल्पना यायच्या आत मी त्यांच्या पायावर डोकं ठेवलं. त्यांना नमस्कार केला आणि झटकन् तेथून निघालो. त्यांनी आशीर्वाद दिला किंवा नाही हेही मी पाहिलं नाही.

तसं म्हटलं तर माझं मन त्यावेळी रक्ताळलं होतं. माझ्या आशा आकांक्षांच्या चिंधड्या उडाल्या होत्या. हातातून मातीचा घडा पडून फुटावा आणि त्याच्या खापऱ्या इतस्ततः विखुराव्यात तसं माझ्या भावनांच झालं होतं; पण

**ध्येयवादी माणसाने विचाराने विकारांवर मात करायची असते. कर्तव्यदक्षतेने भावना मारायच्या असतात. ध्येय हाच देव मानायचा असतो.**

माझाही ध्येय हाच देव होता. त्याचीच पूजा मला करायची होती. भक्ती करायची होती. आणि

**ध्येयाची भक्ती म्हणजे नुसतं भजन पूजन नव्हे. कोणत्याही संकटांना न जुमानता जी सतत कार्य प्रवृत्त करते, तीच खरी भक्ती !**

पावलं पुढं पडत होती. किती चाललो याचं मोजमाप नव्हतं. रस्ता संपेपर्यंत चालत राहाणं एवढंच डोळ्यापुढे ध्येय होते. 'धनुर्विद्या...

ध्येय...आचार्य...गुरू..." हे शब्द माझ्या समोर फेर धरून नाचत होते. त्या नादात मी किती काळ चालत होतो त्याचं भानच नव्हतं. जाता जाता पुढे दाट झाडी लागली. वाऱ्याची गती संथ होती. सूर्य किरणांचा ताप होत नव्हता. पण त्या झाडांच्या शीतल छायेत आणि वाऱ्याच्या गारव्यात दु:खी मनाला शांत करण्याचं सामर्थ्य नव्हतं!

रस्त्याने जात असताना माझ्या डोक्यावर काहीतरी पडल्याचं मला जाणवलं. सहज मी पाहिलं. गवताच्या काड्या होत्या. कोठून पडल्या असाव्यात ह्या? मी वर पाहिलं, त्या झाडावर एक चिमणी होती. ती घरटं बांधण्याचा प्रयत्न करीत होती. जवळ जवळ पूर्ण झालेल्या घरट्याचा काही भाग ती नीट करीत असावी. काड्या खाली पडत होत्या. मोठ्या कुतुहलानं मी दूर जाऊन बघू लागलो. कित्येकदा भग्न हृदयाला निसर्गाची संगत सांत्वना देते. शांत करते. चिमणी खाली येऊन त्या काड्या बसविण्याचा प्रयत्न करीत होती. परत त्या खाली पडत होत्या. पंधरा-वीस वेळा असा प्रकार झाला. शेवटी तिनं आपलं घरटं पूर्ण केलं. आपलं ध्येय साध्य केलं. ध्येयपूर्तीच्या आनंदात ती चिवचिवट करू लागली.

मला एकदम माझ्या अपूर्णत्वाची जाणीव झाली. गुरूंनी झिडकारलं म्हणून किती निराशेनं मी निघालो होतो. काहीही सुचत नव्हतं मला. पण निसर्गातला एक छोटासा पक्षीसुद्धा अनेक संकटांना तोंड देत आपलं ध्येय पूर्ण करू शकतो मग मी तर माणूस आहे. मला विचार आहेत. बुद्धी आहे. मला तर माझं ध्येय पूर्ण केलंच पाहिजे. माझ्या मनाचा निश्चय ठरला. बस्स! आता धनुर्विद्या प्राप्त होईपर्यंत इथेच रहायचं आणि आचार्यांनाच गुरू मानून त्यांच्याकडूनच विद्या शिकायची.

आचार्यांना गुरू मानायचं हे ठीक पण ते राहिले दूर! इथं मला ते

मार्गदर्शन कसं करणार? सामान्य माणसाला उपासना करायला समोर ध्येयमूर्ती असावी लागते. मी एका झाडाखाली त्यांचा मातीचा पुतळा तयार केला. आता माझे गुरुदेव अगदी माझ्याजवळ होते.मी श्रद्धायुक्त अंत:करणाने त्यांना वंदन केलं. त्यांची पूजा केली. आणि सांगितलं–

"गुरुदेव ! आपण मला झिडकारलंत. शिष्य म्हणून माझा तुम्ही स्वीकार केला नाहीत. पण गुरुदेव माझी आपल्यावर श्रद्धा आहे. प्रेम आहे. आपणच मार्गदर्शन करू शकाल असा माझा विश्वास आहे. म्हणूनच मी आपली मृण्मयमूर्ती तयार करून तिचंच मार्गदर्शन घेणार आहे. लोकांच्या दृष्टीनं ती मातीची मूर्ती असेल पण मला तसं वाटत नाही.

**निस्सीम भक्तीत आणि श्रद्धेत अचेतनाला**
**सचेतन करण्याचं सामर्थ्य असतं.**

गुरुदेव, आपण मला आशीर्वाद द्या. मी आजच माझ्या अध्ययनाला सुरवात करतो."

मी मस्तक खाली वाकवून नमस्कार केला. आणि काय चमत्कार त्या मूर्तीवरील एक फूल माझ्या मस्तकावर पडले. लोकांना हा योगायोग वाटेल. तथापि,

**योगायोगाच्या संयोगानेच अनेकदा जीवनाची गुंफण होत असते.**

मला माझ्या गुरूंचा आशीर्वाद मिळाला. मी धनुष्य काढलं, बाण घेतला. गुरूंना विचारलं–

"गुरुदेव ! असाच बाण लावायचा असतो ना ?"

मनानेच हुंकार दिला.

"होय. आता सोड बाण."

मी बाण सोडला पण लक्षभेद झाला नाही. पुन्हा दुसरा, तिसरा असे अनेक बाण मी सोडू लागलो. मधूनमधून मी गुरूंना विचारीत असे आणि तेही मला सांगत असत.

असं माझं अध्ययन चाललं होतं. महिने उलटले होते. माझं व्रत तीव्र होत होतं. एके दिवशी मी धनुष्यबाण घेऊन गुरूंना विचारीत होतो—

" गुरुदेव ! समोरच्या निशाणाचा मी अगदी बिनचूक वेध घेतो. तथापि समजा झाडावरती एखादा पक्षी असेल तर त्याचा वेध कसा घ्यायचा ? "

त्यांनी माझ्या कानात काहीतरी सांगितल्याचा भास झाला. त्याचा आनंद मला वाटत होता. माझं लक्ष नव्हतं; पण एक पांथस्थ ते पाहून हसत होता. माझ्याकडे पाहून तो म्हणाला—

" काय पोरगा आहे ? मातीच्या मूर्तीला काय विचारतो ? हसतो काय ? वेड तर नाही लागलं याला ? "

मी लक्षच दिलं नाही. खरंच मला वेड लागलं होतं. ध्येयाकरिता वेडचं व्हावं लागतं.

**ध्येयाचं जर वेड लागलं नाही, तर ध्येयप्राप्ती होत नसते.**

त्याच्या कल्पनेनं, ज्ञानानं ती मातीची मूर्ती होती; पण भक्तीभावानं मी तिच्याकडं पाहात होतो, मला माझे गुरुदेव दिसत होते. मातीच्या मूर्तीहून मला वेगळंच काही दिसत होतं. दिव्य दृष्टीला ते दिसत होतं. ज्ञानाने अपूर्णतेची जाणीव होते; पण भक्तीने पूर्णत्वाचा साक्षात्कार होतो, हे त्या विचाऱ्याला कसं कळावं !

अशीच चार-पाच वर्षे उलटून गेली. मी धनुर्विद्येत प्रवीण झालो. कोणत्याही निशाणाचा अचूक वेध मी घेऊ शकत होतो. एवढंच नव्हे तर शब्दवेध सुद्धा मला घेता येत होता. माझ्या गुरुजींची संपूर्ण कृपा होती. माझ्यावर माझं ध्येय मी गाठलं होतं. चिमणीनं अखेर तिचं घरटं पूर्ण केलं होतं.

नेहमी प्रमाणं मी धनुर्विद्येचा सराव करीत होतो. जंगलात रहात असल्या पासून मी वल्कलंच नेसत होतो. केसही अस्ताव्यस्तच होते. एकंदरीत रानात रहाणाऱ्या माणसा सारखा मी विचित्र दिसत होतो. एवढ्यात एक कुत्रं तिथं आलं आणि ते माझ्या अंगावर उगीचच भुंकू लागले. मला कळेना हे का भुंकत आहे? मी त्याला हकलण्याचा प्रयत्न केला पण ते जाईना. माझ्या हातातला धनुष्यबाण पाहून ते पुढेही येईना. शेवटी मी एक युक्ती योजली. धनुष्य घेतलं. त्याला बाण जोडले आणि लागोपाठ सात बाण त्याच्या तोंडात असे मारले की, त्याला भुंकताही येऊ नये व त्याला थोडीही इजा होऊ नये. हे करता क्षणीच ते कुत्रं पळून गेलं. खरं म्हणजे यात मी विशेष असं काहीच केलं नव्हतं.

काही क्षण गेले नाहीत तोच माझ्याकडे काही राजकुमार येताना मला दिसले. ते माझ्या अगदी जवळ आले. त्यांना कुठं तरी पाहिल्या सारखं वाटत होतं; पण नेमकं कुठं ते मात्र मला आठवत नव्हतं. त्यातला एक जण माझ्या आणखी जवळ आला. त्याच्याकडे एकसारखं बघतच राहावं असं मला वाटत होतं. आकर्ण नेत्र कमालीचे बोलके होते. तारकांचं तेज त्यांच्यात सामावलं होतं. डोळ्यांच्या कडांत पूर्वेनं आपला लालीमा मिसळला होता. कपाळ भव्य होतं. नाक सरळ तरतरीत होतं. हनुवटी भाल्याच्या टोकासारखी निमुळती होती. सारं शरीर कसं रेखीव होतं. चित्रकाराच्या कुंचल्यानं साकार झालेल्या एखाद्या नयन मनोहर चित्राप्रमाणे! जवळ येऊन तो म्हणाला—

"तुझं नाव काय? काय करतोस इथं?"

मेघांच्या आवाजा सारखा त्याचा आवाज गंभीर होता. माझी चौकशी करणारा हा पहिलाच युवक होता. बरेच दिवसांनी माणसाशी बोलायला मिळालं होतं. मला बरं वाटलं. मी म्हणालो—

" माझं नाव एकलव्य ... इथं धनुर्विद्येचं अध्ययन करीत होतो. आता माझं ध्येय पूर्ण झालं आहे."

" असं, आणि या अरण्यात शिकवतं कोण तुला ?"

" माझे गुरू इथंच असतात. ते काय. द्रोणाचार्य त्यांचं नाव. तेच माझे गुरू आहेत. त्यांनीच मला ही अमोल विद्या शिकविली."

द्रोणाचार्यांचं नाव काढताच त्याच्या कपाळाला बारीकशी आठी पडली. माझ्या नजरेतून ती सुटली नाही. कोणते विचार त्याच्या मनात थैमान घालीत होते कोण जाणे ? तरीही मी त्याला विचारलं—

" मित्रा, तुझं नाव काय ? तू कशाला आला होतास इथं ?"

" माझं नाव अर्जुन. शिकारीकरिता आलो होतो मी. तुझं मघाचं शरसंधान पाहून आश्चर्य वाटलं म्हणून मी चौकशीला आलो."

एवढं बोलून तो निघून गेला. बहुधा त्याला माझा हेवा वाटत असावा. कारण त्याचेही गुरू द्रोणाचार्यच होते. त्याच्यापेक्षा काकणभर मी श्रेष्ठ आहे असं तर त्याला वाटलं नसावं ना ? मला त्याच्याशी काहीच कर्तव्य नव्हतं. मी ते विचार झटकून टाकले आणि माझ्या कामाला लागलो.

दुसऱ्या दिवशी अर्जुन जेव्हा द्रोणाचार्यांना तेथे घेऊन आला तेव्हा मात्र मला आश्चर्य वाटले. गुरू आलेले पहाताच मला केवढी धन्यता वाटली ! अमृताच्या गोडीचं वर्णन मुका शब्दानं करू शकेल का ? तसंच माझं झालं. मी त्यांना सामोरा गेलो. त्यांची चरणधुली मस्तकी लावली. मग त्यांनीच बोलायला सुरवात केली.

" एकलव्या, काल अर्जुनानं तुझ्या शब्दवेधाचं कौतुक केलं म्हणून बघण्याकरिता मी आलो. पण मला आश्चर्य हेच वाटतं की, मी इथं तर कधीच आलो नाही आणि तुला कधी शिकविलंही नाही. मग तू माझा शिष्य कसा ?"

घडलेली सारी हकीगत मी गुरूंना सांगितली. ती सांगत असताना त्यांना आनंदाचं भरतं आलं होतं. हकीगत संपताच त्यांच्या मुखातून "धन्य, धन्य, एकलव्या ! धन्य आहे. तुझी" एवढेच शब्द आले.

**अती आनंद किंवा अती दुःख माणसाच्या जीभेवरचे शब्द नष्ट करते. उरतात त्या फक्त भावना. डोळ्यात तरळणाऱ्या !**

माझी हकीगत सांगून मी त्यांना म्हटलं–

"गुरुदेव, आपण माझे गुरू आहात. आपण आज प्रथमच माझ्याकडे आलात. मी आपली काय सेवा करू ? आपल्याला कोणती गुरुदक्षिणा देऊ ?"

क्षणभर ते गप्पच राहिले. मघाचा आनंद बदलत चालला होता. त्यांचा चेहरा कष्टी दिसत होता. असं का झालं होतं मला सांगता येणं कठीणं होतं. मोठ्या कष्टाने ते म्हणाले –


"एकलव्या, तुझ्या इच्छेनुसार आज तुझ्याजवळ मी गुरुदक्षिणा मागणार आहे."

"गुरुदेव, आपण कोणतीही गुरुदक्षिणा मागा, मी ती आपणांस देईन आज मी माझ्या कृतार्थतेचा दिवस मानतो. आज्ञा व्हावी गुरुदेव !"

"मला ... मला तुझ्या उजव्या हाताचा अंगठा कापून दे."

एक निमिषभर अंगावर वीज पडावी तसं झालं मला. पण ज्यांनी मला शिकविलं त्यांची ही छोटीशी मागणी पूर्ण करणं माझं कर्तव्य होतं. तात्काळ मी माझ्या उजव्या हाताचा अंगठा तोडला आणि त्यांच्या चरणावर अर्पण केला. हातातून रक्ताची धार वहात होती. गुरूंच्या नेत्रात आनंदाश्रू तरळत होते. अर्जुनाच्या चेहऱ्यावरही स्मित हास्य तरळत होतं. तरीही दोघांची कारणं वेगळी असावीत असं मला वाटलं. गुरूंनी मला आशीर्वाद दिला, "एकलव्या, तुझी

ध्येयनिष्ठा, गुरुभक्ती या गुणांची वाखाणणी चंद्रसूर्य असेपर्यंत जग करीत राहील. माझा तुला आशीर्वाद आहे." नंतर त्यांनी प्रेमळ दृष्टीने माझ्या बोटाकडे पाहिले. रक्त येण्याचं ताबडतोब थांबलं. तिथं नवीन कातडं आलं, पण अंगठा मात्र नव्हता. मी त्यांना पुन्हा वंदन केलं. त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेविला आणि झटकन् वळून मार्ग आक्रमायला सुरवात केली.





# ध्येयनिष्ठेचा पीळ

पुष्यमित्राने रागारागानेच आपल्या महालात प्रवेश केला. संतापाने चेहरा लालबुंद झाला होता. अंग थरथरत होतं. उजव्या हाताची मूठ तलवारीवर घट्ट आवळलेली होती. विचाराने डोक्याच्या शिरा थाड थाड उडत होत्या. महालात आल्यावर संतापानेच बेचैन अवस्थेत तो फेऱ्या मारीत होता. विचारांचा वेग मात्र कमालीचा वाढला होता. तो बडबडू लागला.

“राजा ! राजा ! बृहद्रथ हा काय राजा आहे ? सेनापती झाल्यापासून मी किती मोठं ध्येय उराशी बाळगलं ! शेवटचा रक्तबिंदू असेपर्यंत माझ्या हिंदूराष्ट्राचं स्वातंत्र्य अबाधित राखीन. पण आज मिन्यांडरने स्वारी केली ! आमच्या स्वातंत्र्याला ग्रहण लागायची वेळ आणली ! तरी आम्ही काही करू शकत नाही ? तलवार आमच्या कंठाशी भिडली तरी आमच्या राजाचे ‘शांतिपाठ’ सुरूच आहेत. धर्म प्रवचनं चालली आहेत दरबारात ! शत्रूला शांततेचा उपदेश ! अशानं जर शत्रू वठणीवर येत असता तर साऱ्या तलवारीच्या विळ्या झाल्या असत्या ! ! युद्धभूमीला रक्ताभिषेकाची कधी वेळच आली नसती. पण,

राज्यं केवळ शांततेच्या भ्याड प्रयत्नानं चालत नसतात, हे कटू सत्य आहे. ज्याच्या हातात शस्त्रबळ आहे, ज्यांची मनं कणखर आहेत तेच फक्त साम्राज्य मिळवू शकतात आणि टिकवू शकतात. ज्यांना धर्म-प्रवचन ऐकायची असतील आणि शांतिपाठ जगाला सांगायचे असतील त्यांनी खुद्द बुद्धासारखंच राज्य सोडून द्यावं आणि त्याचा प्रचार करीत हिंडावं. राज्य करू नये... खरंच, त्यांनी राज्य करू नये."

पुष्यमित्राची नजर दाराकडे गेली. दारातून त्याची पत्नी प्रवेश करीत होती. तरी त्याची बडबड सुरूच होती.

"राज्य करण्याचा त्यांना अधिकारच नाही. जर असे लोक राज्यावर असले, मोहाने राज्य चालवायला लागले, ... राज्यावरून निघून जाणं त्यांना जमत नसेल तर... तर..."

पुष्यमित्राचे रागावलेले रूप पाहून त्याची पत्नी थोडी दचकली, पण अशी रूपे पहाण्याची तिला सवय होती. सेनापती झाल्या पासून पुष्यमित्राचे महाराजांशी नेहमी खटके उडत असत. घरी आल्यावरही तो राग बराच काळ तसाच टिकून रहात असे. मग हळुवारपणे तिने बोलायला सुरवात केल्यावर दरबारातला सारा वृत्तांत तिला समजत असे. त्याचे आणि तिचे विचार सारखेच होते म्हणून तो तिला साऱ्या गोष्टी सांगत असे. दोघांची मनं स्वराष्ट्राच्या अभिमानाच्या मुशीत तयार झालेली होती. सारा वृत्तांत ऐकून घेतल्यावर मग कधीकधी तीच एखादा मार्ग पटकन् सांगत असे आणि त्या निर्णयावर स्वत: पुष्यमित्रही एकदम खुश होत असे.

आज दरबारात तसंच काहीतरी घडलं असावं असं तिला वाटलं. तिनं महालात प्रवेश केला. हलक्या आवाजातच ती पुष्यमित्राला म्हणाली–

"आज महाराजांचेकडे काही घडलं वाटतं ?"

"हं ! महाराजांनी आज आम्हांला जाब विचारला."

" जाब ? कसला ?"

" आम्ही मिन्यांडरवर, ग्रीक सेनापतीवर सैन्य पाठवलं म्हणून."

" राज्य रक्षणाच्या दृष्टीनं ते आपलं कर्तव्यच आहे. सैन्य पाठविलं नाही तर राज्याचं रक्षण कसं होणार ? त्यात मला तर काहीच चूक दिसत नाही."

" चूक आम्हांलाही वाटत नाही ! . . . पण महाराजांना वाटते! "

" म्हणजे, शत्रू जर आपलं राज्य घ्यायला आला तर सैन्य पाठवून राज्याचं रक्षण करायचं नाही, तर मग काय बांगड्या भरून त्याला सामोरं जायचं ?"

" अगदी तसंच नाही. . . . पण त्याच्या सारखंच !"

" अर्थ नाही कळला आपल्या बोलण्याचा."

" तुम्हांला आठवतं, दोन महिन्यांपूर्वी आम्ही असेच महालात बसलो असताना आमच्या हेरानं बातमी आणली की, ग्रीकांचा सेनापती मिन्यांडर आमच्यावर स्वारी करणार आहे. आम्हांला त्याची कल्पना होतीच. कारण चार वर्षांपूर्वी त्यांचा कलिंगाच्या खारवेल राजानं पराभव केला असला तरी आता तो राजा कलिंग देशाला गेला आहे. तो आपल्यावर हल्ला करायला परत येणार नाही. हे त्यांना माहीत होतं. आणि इकडे पाटलीपुत्रात, आमच्या राजधानीत राजकारणाऐवजी धर्मकारणं चालतात. शस्त्रांच्या खणखणाटाऐवजी धार्मिक मंत्रांचे घनगंभीर आवाज येतात आणि युद्धाच्या भाषेऐवजी शांतिपाठ चालतात. अशानं राज्यात शांतता नांदेल ही किती वेडी समजूत आहे महाराजांची ?

**युद्धाची संपूर्ण तयारी असणं, हीच शांतता प्रस्थापित करण्याची नांदी असते.**

हे महाराजांना समजत नाही. पटत नाही. म्हणून राज्यातही अशी थेरं चालली आहेत. अशा स्थितीत ग्रीक लोक आमच्यावर हल्ला करण्याची संधी पाहात असले तर त्यांचा त्यात काय दोष ? पण गेल्या काही दिवसात येथे झालेला बदल त्यांना माहीत नव्हता."

"आपल्याकडे बदल ! कोणता ?"

"आमच्याकडे आलेलं सेनापती पद ! आम्ही ध्येयनिष्ठ आहोत. हिंदु राष्ट्राचं स्वातंत्र्य अबाधित राखणं हेच आमचं ध्येय आहे. आम्ही बुद्ध धर्माची दीक्षा घेऊन शांतिपाठ सांगायला सेनापतीपद घेतलंच नव्हतं ! ग्रीकांचा पराभव झाला तरी ते पुन्हा आमच्याविरुद्ध लढणारच नाहीत, हे आम्हांला कधीच पटलं नव्हतं. म्हणूनच आम्ही आमच्या सैन्याची योग्य ती व्यवस्था केली ! त्यांना योग्य ते शिक्षण दिलं ! त्यांची मनं कणखर बनविली !

**कारण युद्धात लढतात ती शस्त्रं नव्हे तर त्यांच्या मागे असणारी सैनिकाची कणखर मनं !**

त्यांना आम्ही सांगत होतो की, 'योद्धयांनो ! शूरांना युद्धात मरण येणं हा भाग्याचा योग आहे. रणांगणावर मृत्यू आला तर त्याला तात्काळ स्वर्ग मिळतो. सूर्यमंडलाचा भेद करून जाण्याचं सामर्थ्य केवळ दोघात असतं. एक योग्यात नि दुसरे योद्धयात ! ! तेव्हा आपल्या मातृभूमीकरिता, स्वातंत्र्याकरिता प्राणपणाने लढा. तेच तुमचं ध्येय असू द्या.' यामुळं आमचं सैन्य सज्ज होतं. याची मिन्यांडरला कल्पना नसल्यानेच त्यानं आमच्यावर शस्त्र उगारायचं ठरविलं. म्हणून ज्यावेळी हेरानं आम्हांला, बातमी दिली, त्यावेळी आम्ही त्याला महाराजांचेकडे पाठविले.'

"मग, महाराजांनी युद्ध करायची परवानगी दिली का ?"

"छे, ते तशी परवानगी देतील याची सुतराम शक्यता नव्हती. पण ते राजे आहेत. त्यांचं मत घेणं हे आमचं कर्तव्य होतं"

" महाराज काय म्हणाले मग ?"

" आमच्या हेराला प्रथम ते आतच घ्यायला तयार नव्हते."

" का ? काही महत्त्वाच्या कामात होते की काय ?"

" त्यांचं नेहमीचंच महत्त्वाचं काम, धर्म प्रवचनं ऐकणं ! राज्याची कामे नंतर ! त्यांनी निरोप पाठविला प्रवचन संपल्यावर आम्हांला भेटा. पण दूताने जेव्हा पुन्हा पुन्हा विनंती केली तेव्हा त्याला कशी तरी भेटायची परवानगी मिळाली. ".

" मग पुढं काय झालं ? "

हेर आतमध्ये गेला, तेव्हा त्याला नेहमीचंच दृश्य दिसलं. बौद्ध भिक्षू प्रवचन करीत होता. महाराज शांतपणे ऐकत होते. प्रवचनाचा त्यांच्या-वर भलताच अम्मल चढला होता असं हेर म्हणाला, 'कशावरून ?' असं जेव्हा आम्ही त्याला विचारलं तेव्हा तो म्हणाला, ' मी सांगितलेली माहिती ऐकल्यावर महाराज काही तरीच बोलत होते.'

" तुमच्या हेरानं माहिती तरी काय सांगितली ? तुम्हांला सांगितली त्यापेक्षा काही वेगळी तर नव्हती ना ? "

त्यानं सांगितलं की, ' मिन्यांडर आमच्यावर स्वारी करीत आहे. आपण आपल्या रक्षणाची व्यवस्था करायला हवी, पण हे ऐकताच महाराज म्हणाले – ' अरे, या जगात कोणीच कोणाचा शत्रू नाही. मग मिन्यांडर तरी आपला शत्रू कसा असेल ? आणि समजा तो स्वारी करून आलाच तर त्यात रागवायचं कशाला ? कदाचित् तुम्हांला सुरवातीला राग येईल पण प्रत्येकाने अक्रोधाने क्रोध जिंकला पाहिजे. तो येथे आल्यावर आमचे बुद्ध भिक्षू त्याला बौद्ध धर्माची तत्त्वे समजावून सांगतील. मग त्याला खरा धर्म कळेल आणि तो आपल्या धर्मात आला, त्याचं हृदय परिवर्तन झालं की मग कोणीच कोणाचा शत्रू नाही. हा आपला विजय आहे. आपल्या धर्माचा विजय

आहे. तुला माहीत आहे, आमचे हे भिक्षू आत्ताच आम्हांला सांगत होते. " शस्त्रविजयापेक्षा धर्मविजय केव्हाही श्रेष्ठच असतो. आम्हांला धर्मविजयच मिळवायचा आहे. तेव्हा तू काही काळजी करू नको."

" मग आपण कोणता निर्णय घेतलात ? "

" आम्हांला लढाईचाच निर्णय घेणं आवश्यक होतं. आमचं ध्येय हिंदुराष्ट्र स्वतंत्र राखणं हेच होतं आणि आहेही. स्वातंत्र्य, शांतीच्या भ्याड प्रयत्नानं टिकत नसतं. ज्यावेळी कोणत्याही शत्रूला आम्ही तलवारीच्या जोरावर वठणीवर आणतो त्याचवेळी तो नम्रता धारण करतो. आमच्याशी मिळतं जुळतं घेतो. आमच्यात सामावू शकतो. या स्थितीत युद्धाशिवाय शांतता नांदणे अशक्यच असते. कोणत्याही ध्येयनिष्ठ माणसाने, अशावेळी, आपल्या हातात असणाऱ्या सत्तेचा उपयोग करून शत्रूशी युद्ध करण्याचाच निर्णय घेतला असता. आम्हांलाही तोच निर्णय घ्यावा लागला. आमचं पुढं काय होईल याचा कोणताही विचार न करता ! "

" ध्येयनिष्ठ पुरुषाला साजेसंच वर्तन आपल्या हातून घडलं. आज आता आपल्या सैन्याची काय स्थिती आहे ? शत्रूविजयाचं आणि स्वातंत्र्य अबाधित राखण्याचं आपलं ध्येय पूर्ण झालं का ? "

" गेले आठ दिवस आमचं सैन्य शत्रूशी लढतं आहे. प्रत्येक वेळेला शत्रूचा पराभव होतो आहे. पण शत्रूही समर्थ आहे. एकदम माघार घेत नाही. तो सहजासहजी पराभव पत्करणारा नाही. सैन्याची पराकाष्ठा चालली आहे. रक्ताचे पाट वहात आहेत. शत्रूकडचे लोक भराभर कमी होत आहेत. त्याचा संपूर्ण बंदोबस्त झाल्या शिवाय, त्याचा कायमचा नायनाट झाल्याशिवाय परत येऊ नका अशी आमची आमच्या सरदारांना आज्ञा आहे. हे असं चाललं आहे हे महाराजांना समजलं म्हणूनच त्यांनी आज आम्हांला भेटायला बोलावलं होतं. "

" म्हणून का बोलावलं ? "

" हं ! जाब विचारायला. आम्हांला कल्पनाही नव्हती कीं महाराज एवढं आकांड तांडव करतील ! पराभव पत्करावा लागला असता तर हे योग्य होतं; पण यशश्री माळ घालीत असताना, शत्रूचं सैन्य मारलं जातं म्हणून ओरडणारा राजा आम्ही आज प्रथमच पाहिला.

आमंत्रणाबरोबर आम्ही महाराजांचेकडे गेलो. महाराज त्यांच्या महालात होते. सुदैवाने त्यावेळी तेथे कोणी बुद्ध भिक्षू नव्हता. नाहीतर आम्हांलाही प्रवेश मिळाला नसता. आम्हांला पहाताच संतापानेच ते म्हणाले–

" आम्ही ऐकतो आहोत ते खरं आहे काय ? " आम्हांला काहीच बोध झाला नाही. आम्ही विचारलं–

" महाराज, आम्ही आपल्या बोलण्याचा अर्थ नाही समजलो. "

" आपण मिन्यांडरवर सैन्य पाठवलं आहे म्हणे ? "

" होय ! "

" कोणाच्या परवानगीनं आपण सैन्य पाठवलंत ? आम्ही राजे असताना आम्हांला याची खबरही मिळू नये ? "

" महाराज, शत्रू अगदी सीमेवर पोहचला होता. आपल्या प्रजेचं जीवीत धोक्यात होतं. तातडीनं उपाय योजना होणं आवश्यक होतं. त्यांच्याशी लढून त्यांचा पराभव करणं हाच एक मार्ग आमच्या समोर होता. शत्रूला जिंकल्याशिवाय त्याचा उपद्रव कमी झाला नसता. म्हणून नाईलाजानं ... "

" शत्रू...शत्रू ! कोण कोणाचा शत्रू ? सेनापती, आपल्याला माहीत आहे की, आम्ही बौद्ध धर्माचे अनुयायी आहोत. आमच्या राज्याचा देखील तोच धर्म आहे. या धर्मात कोणीच कोणाचा शत्रू नाही. अज्ञानानं लोक शत्रू आणि मित्र या भावना करून घेतात. मिन्यांडर जर येथे

आला असता तर तोही आमचा मित्र बनला असता. आम्ही ऐकतो आहोत की, तो बुद्ध धर्मच स्वीकारणार आहे. असं असताना आपण सैन्य कां पाठवलं ? याचा जाब आम्ही मागतो आहोत."

"महाराज ! शत्रू हा शत्रूच असतो. कोणत्याही उपयाने तो आपला मित्र बनणं शक्य नाही. असं आजपर्यंत कधी झालं नाही. कारल्याच्या वेलाला रोज जरी साखरेचं पाणी घातलं तरी त्याला कधी गोड कारली येतील का ? सापाला कितीही दूध पाजले तरी तो कधी अमृत ओकलेला आपण पाहिले आहे का ? निदान ऐकले आहे का ? तेव्हा शत्रू हा शत्रूच असतो आणि स्वार्थाने प्रेरित झालेल्या शत्रूकडून तर कसलीच अपेक्षा करू नये. त्याला रणांगणात ठार मारणे एवढा एकच उपाय आहे आणि त्याचंच पालन आम्ही करतो आहोत."

"सेनापती ! कोणापुढं बोलता अहात आपण ? या युद्धात प्रचंड हत्याकांड चाललं आहे. आम्हांला हिंसा आजीबात पसंत नाही, याची कल्पना असताना आणि आमची परवानगी नसताना आपण सैन्य पाठवलंत आणि वर ही भाषा ? आपल्या भवितव्याचा काही विचार केलात का ?"

"भवितव्य....भवितव्य....! महाराज, आपल्याला जाब पाहिजे ना ? जाब देतो आहे ऐका—ज्या दिवशी आम्ही मिन्यांडरवर सैन्य पाठवलं आणि त्याचा कायमचा बंदोबस्त झाल्याशिवाय तसूभर सुद्धा माघार घ्यायची नाही असं आम्ही आमच्या सरदारांना बजावलं त्याच दिवशी आम्ही आमच्या भवितव्याचा विचार केला आहे. आम्ही सेनापती असताना आमच्या राज्याचं रक्षण करता आलं नसतं तर आमची नामुष्की झाली असती. सारी प्रजा आमच्या दुबळेपणावर थुंकली असती. स्वातंत्र्य टिकविणं हे आमचं ध्येय आहे. त्याकरता योग्य तेच केलं आहे. आणि ते जर आपणांला पसंत नसेल

तर होणाऱ्या परिणामाला आणि येणाऱ्या संकटाला तोंड द्यायला आम्ही तयार आहोत."

"सेनापती ! आमचा अपमान ? ... ? "

"मान आणि अपमान आपल्या हातानं होत असतो. महाराज ! आपण राजे अहात. प्रजेचं पालन करणं आणि त्यांचं परचक्रापासून रक्षण करणं हा आपला धर्म आहे. त्यांच्या जीविताची सुरक्षितता आपल्यावर अवलंबून आहे. प्रजा नेहमी राजाच्या आधाराने जगत असते. अशा स्थितीत परकीय शत्रूने आपल्यावर आक्रमण केले असताना आपण आम्हांला शांतिपाठ ऐकविता ? युद्ध करण्यात ज्याचा जन्म गेला, शत्रूला खडे चारण्यात ज्यानं हयात घालविली, त्याला हाती जपाची माळ धरायला सांगता ? महाराज ही राजनीती आहे. आपल्याला जर धर्माचंच काम करायचं असेल तर राज्य सोडून द्या आणि भिक्षूंच्या मठात राहून धर्माचा आचार आणि प्रचार करा. राजसिंहासन त्याला योग्य नाही.

"सेनापती ... आपल्याकडून उपदेश ऐकण्याची आमची इच्छा नाही. जास्त बोलाल तर ... तर ... "

"जास्त बोलायला इथं वेळ आहे कोणाला ? पण जाता जाता एक लक्षात ठेवा,

**राज्यं शक्तीच्या आणि शस्त्राच्या जोरावर टिकत असतात, सदिच्छा आणि शांतिपाठाच्या नव्हे !"**

"बस् झाली मूर्खासारखी बडबड, तुमचं पांडित्य आम्हांला नको आहे. इथले सर्वाधिकारी आम्ही आहोत. सम्राट आम्ही आहोत. आम्ही आज्ञा करतो की, "सैन्य मागे घ्या." कोण आहेरे तिकडे?

एक सेवक आत आला मुजरा करून उभा राहिला.

"आज्ञा महाराज ! "

" युद्ध आघाडीवर आमची आज्ञा कळवा की, युद्ध ताबडतोब बंद करा. "

दूत निघून गेला. रागाच्या भरातच आम्ही दरबारात ओरडलो–

" महाराज, हे होणं शक्य नाही. "

महाराजही संतापाने म्हणाले–

" सेनापती, ही आमची आज्ञा आहे. हे असंच झालं पाहिजे. "

पुढं काय घडतं आहे हे पाहण्याकरिता आम्ही तेथे थांबलोच नाही. रागानेच महालाच्या बाहेर पडलो. घरी येण्याकरिता निघालो पण येताना आठवणीनं एक कामगिरी बजावली ती म्हणजे महाराजांनी ज्या दूताबरोबर निरोप पाठविला त्याला आम्ही ठार मारलं, नाईलाज म्हणून ! आपलं ध्येय पूर्ण व्हावं म्हणून !

नंतर आम्ही घरी आलो. अजून आमचा राग कमी होत नाही. राजाचं असं बोलणं ऐकलं की चीड येते, संताप येतो. असले नादान राजे या भारतमातेला लाभले हे खरोखर आमचं दुर्भाग्यच ! सांगा, आमची काय चूक होती सैन्य पाठविण्यात ? आणि त्या दूताला ठार मारण्यात ? ज्याला स्वातंत्र्याची चाड आहे, स्वातंत्र्याचा अभिमान आहे आणि ते टिकविणं हेच ज्याचं ध्येय आहे त्यानं यापेक्षा वेगळं काय केलं असतं ?

"आपलं काही चुकलं असं मलाही वाटत नाही. पण आता महाराज तर आपल्यावर खूपच संतापलेले आहेत. तशात तुम्ही त्यांचा दूतही मारलात. हे आज ना उद्या महाराजांना कळणारच. मग आतां पुढं काय ठरवलं आहे ? "

" तोच विचार आम्ही मघापासून करीत आहोत. अजून योग्य उत्तर सापडत नाही. अशा राजांच्या कारकीर्दीत स्वातंत्र्य धोक्यात असतं. राजाच्या भीतीपेक्षाही आम्हांला स्वातंत्र्याची काळजी अधिक आहे. सारी सत्ताच खिळखिळी झाली आहे. कुठे धाक नाही. दरारा

नाही. सगळीकडे शांतता आणि अहिंसा यांचंच स्तोम माजलं आहे. सारे सरदारही या राजवटीला कंटाळले आहेत."

" म्हणजे. . . . "

" अहो, परवा आपला अग्निमित्र तेच म्हणत होता. कधी ही राजसत्ता बदलते आहे असं त्याला झालं आहे, भगदत्त, हरदत्त आणखी किती तरी असे सरदार आहेत की जे अगदी कंटाळून गेले आहेत. प्रजाही त्रासली आहे. वैतागली आहे. शिवाय आत्ताच कोठे जय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, प्रजेत आणि सैन्यात नवचैतन्य संचारण्याची वेळ आली आहे तोच युद्ध थांबवून आपला पराभव होतो आहे की काय हे पण सांगता येत नाही."

" का ?"

" आम्ही एक दूत मारला पण हे राजाला कळलं की तो दुसरा दूत पाठवील. जाणारे दूत मरतील, पण दूत पाठविणारा आहे तोपर्यंत हे असंच चालायचं. यातूनही पुढं काय निर्माण होईल सांगणं कठीण आहे. म्हणूनच यावर योग्य मार्ग सापडत नाही. सापडणं कठीण आहे."

" मार्ग सापडत नाही ? आश्चर्य आहे. सारी प्रजा त्रासली आहे. सरदार कंटाळले आहेत. थोडक्यात, सारे बदलाची अपेक्षा करीत आहेत. शिवाय आपल्याला आपलं ध्येय साध्य करायचं आहे. शत्रूचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे. म्हणून यावर एकच उपाय आहे. आणि तो म्हणजे . . . "

" काय उपाय आहे ? कोणता सांगा. "

" सेनापती ! आपल्याला उपाय सांगायची वेळ यावी का ?अहो, ज्याच्या हाती सामर्थ्य त्याचंच राज्य . . . "

" काय बोलता आहात तुम्ही हे ?"

" योग्य तेच बोलते आहे. ज्याच्या हातात सामर्थ्य असतं, ज्याच्या

हातात सत्ता असते तोच राज्य करू शकतो. यावरून काय ते आपण ओळखलं असेल."

"ठीक आहे. आम्ही याचाही जरूर विचार करतो. आम्हांला शांतता हवी आहे. राणी सरकार, आपण आम्हांला शांतता दिलीत तर बरं होईल."

महालात पुष्यमित्र एकटाच बसला होता. विचाराने मन थकून गेलं होतं, तरीही विचार त्याला सोडायला तयार नव्हते. कोणाचा तरी सल्ला घेतला तर बरे होईल असं वाटून त्याने दूताला हाक मारली आणि सांगितलं–

"भगदत्तांना म्हणावं आम्ही तातडीने बोलाविले आहे. महत्त्वाचं काम आहे."

दूत निघून गेला. थोड्याच वेळात भगदत्ताची पावले महालाच्या दाराशी वाजली. भगदत्त आत आला. सेनापतींना त्याने मुजरा केला. पुष्यमित्राने त्याला आपल्या शेजारच्या आसनावर बसविले. नंतर त्यांचं बराच वेळ अगदी हळू आवाजात खलबत चालू होतं. वाऱ्याच्या झुळकेलाही कळलं नाही काय झालं ते ! काय ठरलं ते ! भगदत्त जेव्हा जाण्यास निघाला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. जाताजाता त्याने एवढंच सांगितलं–

"आपण काही काळजी करू नका. पाच सहा दिवसांनीच तो समारंभ आहे. सारी व्यवस्था चोख करून ठेवितो. त्या दिवशी आपण आपली कामगिरी आटोपून तावडतोब परत फिरा. बाकी सारं मी बघतो."

भगदत्त निघून गेला. ती रात्र तशीच अस्वस्थतेत गेली. त्याच प्रमाणं पुढचे दोन तीन दिवस गेले. राज्यारोहणाचा वाढदिवस अगदी एक दोन दिवसावर आला. आतुरता, भीती, मानसिक ताण वाढत होता. तेही दिवस तसेच गेले. उद्या सकाळीच समारंभ होता. दिवस

उगवला आणि थोडीशी मनाची धागधुग वाढवूनच मावळला. रात्र आली. ती अस्वस्थतेतच जात होती. पण तरीही जाताना ती सांगून गेली " माझ्या गर्भातच उद्याचा उष:काल आहे."

समारंभाचा दिवस उजाडला. मुख्य सैनिकी संचलनाच्या कार्य-क्रमाला काही घटकांचा अवधी होता. भगदत्त सकाळीच पुष्य-मित्राकडे आला. तो येताच पुष्यमित्राने मोठ्या मानाने त्याला बसवलं आणि हलक्या आवाजात विचारलं–

" भगदत्त, सारी व्यवस्था झाली ? महाराज स्वत: हजर रहाणार आहेत ना ? "

" होय सेनापती, मी स्वत:च त्यांना आणणार आहे. त्यांच्या जवळपासही मीच रहाणार आहे. "

" त्यांच्याजवळ आपले लोकच रहातील अशी व्यवस्था केली आहे ना ? तसेच महालाचा बंदोबस्त आणि आमच्या येण्याचा मार्ग याचीही चोख व्यवस्था आहे ना ? "

" होय महाराज, आपल्या मार्गाची व्यवस्था हरदत्त सांभाळणार आहेत. आपण सांगितल्याप्रमाणे महालाची जबाबदारी आपले शूर पुत्र अग्निमित्र सांभाळणार आहेत. "

" ठीक आहे. आपण जा. योग्य वेळेला आम्ही येतोच. "

सूर्य बराच वर आला. सारी सज्जता झाली. संचलनाचे सैनिक मानवंदना देण्याकरिता पटांगणात व्यवस्थित उभे होते. बघ्या लोकांची नेहमीप्रमाणं गर्दी होतीच. थोड्यावेळातच महाराजांचे आगमन सूचित करणारी वाद्ये वाजू लागली. सारे लोक तटस्थ उभे होते. गजगतीने सम्राट बृहद्रथ मौर्य यांची मिरवणूक पुढे येत होती. महाराजांची मिरवणूक ठरावीक ठिकाणी आली. महाराज अंबारीतून खाली उतरले मंद मंद पावले टाकीत ते आसना जवळ आले. वाद्यांचा आवाज थांबला.

भगदत्त महाराजांचे जवळ थांबला होता. मानवंदना झाली. महाराज आपल्या आसनावर बसले. संचलनाचा कार्यक्रम सुरू झाला.

भगदत्त एक क्षण थांबला. अगदी थोडावेळ थांबला. निघणार इतक्यात त्याचा दुसरा साथीदार तेथे आला. त्यानं विचारलं 'काय? पुढं काय?' त्यावेळी भगदत्त अबोल राहिला. मुकाट्याने निघून गेला. सगळीकडे निशब्द शांतता होती. कदाचित् वादळापूर्वीची ती असेल. आणखी काही साथीदार आले आणि मुकाट्यानेच कोणाशीही न बोलता निघून गेले.

आणि मग ...? शांतता भंग पावली. काही तरी कुरबूर झाली. काय झालं? कुणास ठाऊक. कोणत्या कारणावरून झाली? त्याचाही पत्ता नव्हता. कुरबुर वाढली. महाराजांच्या जवळच हा प्रकार घडत होता. महाराजांचं लक्ष तिकडं गेलं. शांतता स्थापण्याचा ते प्रयत्न करू लागले. पण गडबड वाढतच गेली. गर्दी वाढली संचलन मात्र व्यवस्थित चालू होतं. एकही सैनिक जागा सोडून जात नव्हता. गर्दी महाराजांचे-पर्यंत भिडली. आणि शेवटी त्यांनाही कळेना हा काय प्रकार आहे.

इतक्यात घोड्यांच्या टापा वाजल्या. जोरात. क्षणात पाच-सहा घोडेस्वार गर्दीत घुसले. क्षणभर धूळ उडाली. आणि दुसऱ्याच क्षणी तलवारींचे वार महाराजांचेवर पडलेले लोकांना दिसले. काय झालं कळलं नाही. कसं झालं कळलं नाही. कोणी केलं कळलं नाही. घोडेस्वार जसे आले तसेच ते क्षणार्धात निघून गेले.

राजपरिवारातील लोक आक्रोश करू लागले. लोकांना समजलं, महाराजांचा वध झाला आहे. लोक तेथे जमू लागले तोच भगदत्ताच्या सैनिकांनी त्यांना अडविलं. सगळ्या लोकांना शांत केलं. बृहद्रथाच्या साऱ्या सैनिकांना गिरफ्दार करण्यात आलं. मग भगदत्ताने लोकांना ओरडून सांगितलं –

"प्रजाजनहो ! आपलं रक्षण करण्याचं सामर्थ्य ज्याच्या अंगात नव्हतं, जो राजकारभार विसरून धर्मप्रवचनातच सारा वेळ घालवीत

होता आणि ग्रीकांच्या सारख्या शत्रूला मित्र मानण्याचा खुळचटपणा करीत होता, त्याचा पुष्यमित्राने आज वध केला आहे. आता आजपासून महान् कर्तृत्ववान, भाग्यशाली, परमवीर, हिंदु साम्राज्य स्वतंत्र राखणारे आणि प्रजाहित हेच ध्येय उराशी बाळगणारे असे महाराज पुष्यमित्र हे राज्याचे सम्राट म्हणून सिंहासनावर बसणार आहेत. तेव्हां साऱ्यांनी त्यांच्या नावाचा जयघोष करा."

गर्दीतून आवाज दुमदुमला 'सम्राट पुष्यमित्र की जय' आणि तोच ध्वनी बराच काळपर्यंत ऐकू येत होता.

भगदत्ताचं साऱ्यांनी ऐकलं. कोणाचाही विरोध झाला नाही. तशी व्यवस्था चोख ठेवली होती. कार्यक्रम बरखास्त करण्यात आले सारे प्रजाजन आपापल्या घरी गेले.

दुपार उलटून गेली होती. भगदत्त, हरदत्त, आणि राजधानीतले प्रमुख सरदार सम्राट पुष्यमित्राकडे उपस्थित राहिले होते. राज्याभिषेकाच्या तयारीची बोलणी चालली होती. सगळ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह, आनंद ओसंडत होता. झालेला बदल एकंदरीत साऱ्यांनाच मानवला होता. सगळे चर्चेत दंग असतानाच महालाचा पडदा सरकला. दूत आला. मुजराकरून तो पुष्यमित्राला म्हणाला–

"महाराज, युद्धभूमीवरून आपला दूत आला आहे."

"जा, त्याला लवकर आत पाठवून दे."

दूत आत आला. मुजरा करून तो उभा राहिला. सारं दृश्य पाहून तो थोडासा भांबावला. बावरला. तरीही त्याच्या चेहऱ्यावरच्या आनंदाच्या छटा गेलेल्या नव्हत्या. क्षणाचीही शांतता असह्य होऊन पुष्यमित्रानेच त्याला विचारले–

"काय बातमी आहे ?"

"महाराज, आपला संपूर्ण विजय झाला आहे. शत्रूला सिंधू नदीच्या पलिकडे पिटाळून लावले आहे. त्याचा कायमचा बंदोबस्त

झाला आहे. आता परत आपल्या राज्याकडे वाकडी मान करून पहाण्याची त्यांची ताकद नाही."

"धन्य, धन्य वीरांनो! या विजयाप्रित्यर्थ नगरात आनंदोत्सव साजरा करा. हत्तीवरून साखर वाटून ही विजयाची वार्ता साऱ्या नगराला कळू द्या."

"जशी महाराजांची आज्ञा."

दूत बाहेर गेला. पुष्यमित्राने भगदत्ताला सांगितलं–

"भगदत्ता, याच सप्ताहात शुभ मुहूर्तावर आमचा राज्याभिषेक होईल. आज आर्यावर्तातील बुद्ध धर्मियांची राजकीय सत्ता नामशेष झाली आहे. हिंदुराष्ट्र स्वतंत्र आहे. त्याचं स्वातंत्र्य अबाधित आहे. आमचं ध्येय आम्ही पूर्ण केलं आहे. तेव्हा आता वैदिक धर्मानुसार, सार्वभौमत्वाचं द्योतक म्हणून अश्वमेध यज्ञ करावा अशी आमची इच्छा आहे."

सर्वत्र सरदारांनी आनंदाने सांगितलं–

"महाराज, आपला विचार योग्यच आहे."

"बरं आहे तर मग! लवकरच अश्वमेध यज्ञ केला जाईल. सारे तयारीला लागा."

पुष्यमित्राने आज्ञा केली आणि लगेच पाठ वळवून तो दुसऱ्या महालात गेला.





शस्त्राने टिकती राज्ये।
युक्तीने कार्य होतसे ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... वि ...
नोंद दि. ...



राष्ट्र रक्षणार्थ तुला, सुवर्ण-निधि अर्पितो।
मातृभू स्वतंत्र राख, हेचि आजि प्रार्थितो॥



# ध्येयनिष्ठेचा मानदंड

रात्र थकली होती. चंद्रकोर झुकली होती. साऱ्या जंगलावर धूसर चांदण्याचा अम्मल होता. झाडांच्या दूरवर पसरलेल्या अस्पष्ट छाया अस्ताव्यस्त होत्या. एकमेकात मिसळून त्यांचं जाळं तयार झालं होतं. मधूनच येणाऱ्या थंड वाऱ्याच्या झुळकेने त्या शहारत होत्या. थरथरत होत्या. कधीमधी झाडांची पानं संथ गतीनं खाली येत होती. लांबवर पसरलेली अरवली पर्वताची शिखरे शांत निरामय वातावरणात भोवतालच्या प्रदेशावर गस्त घालीत होती. पक्षी थकून झोपले होते. फक्त ऐकू येत होते, भयाण शांततेचा भंग करणारे रात किडयांचे भेसूर आवाज ! आणि त्यामुळेच शिशिरातील काकडलेली रात्र संपता संपत नव्हती.

जंगलातली रात्र ती. किती शांत ! किती शीतल ! पण मन शांत नसेल तर किंवा ते दु:खाने तळमळत असेल तर चंदनानंही अंग पोळतं. म्हणूनच एवढी शांत रात्र, एवढी शीतल रात्र एका योग्याला शांत

वाटत नव्हती. भयाण वाटत होती. त्याच्या मनाची सारखी तळमळ चालली होती.

सारं जग झोपेच्या आधीन असताना अरवलीच्या एका कुशीत, त्या भयाण जंगलात एक झोपडी जागी होती. भोवतालच्या अस्पष्ट धूसर काळोखात एक ज्योत तेवत होती. एक योगी तपश्चर्या करीत बसला होता. त्याचं नाव ? त्याचं नाव राणा प्रताप ! राजराजेश्वर, मेवाडाधिपती राणा प्रताप ! पण आज मेवाड स्वतंत्र राखण्याच्या ध्येयापाठीमागे लागून बनलेला वनवासाधीश्वर, वल्कलधारी, छत्र-हीन सम्राट, राणा प्रताप ! !

छत्रहीन सम्राट ? होय, छत्रहीन सम्राट ! ! आपलं जीवन एकाकी घालवीत होता तो. एकांतात माणूस विचारचक्रांत सापडतो. विचार आणि कल्पनेचे खेळ हीच त्याची सोबत असते. त्यांचीच संगत जोडावी लागते. राणाही आपल्या झोपडीच्या जवळच्या शीलाखंडावर विचार करीत बसला होता. विचार होते मेवाडच्या स्वातंत्र्याचे ! मेवाडच्या भवितव्याचे ! ! दुसरे विचार त्याच्या मनाला शिवत नव्हते. ध्येय-वेड्या माणसांच्या डोक्यात आपल्या ध्येयाचेच विचार घोळत असतात. त्यांनीच ते पछाडलेले असतात. त्यातच त्यांचा आनंद असतो.

" जनतेच्या हृदय सिंहासनावर माझंच साम्राज्य असताना आज मेवाडच्या भूमीवर मात्र अकबराचं साम्राज्य असावं ना ? हळदी-घाटात आमचा पराभव झाला. संपूर्ण पराभव झाला. अर्थात त्याचा विचार करण्याची ही वेळ नाही. करायची आवश्यकताही नाही. पण माणसं किती कृतघ्न असतात याची जाणीव मात्र हळदी घाटातील युद्ध आम्हांला सतत करून देत राहील. यात तिळमात्र शंका नाही. मानसिंग ! रजपुतांच्या रक्ताचा पण त्यांच्यावरच उलटला. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ! !

त्या दिवशी मानसिंग आपल्या हत्तीवरून हळदीघाटीचं सौंदर्य टिपीत टिपीत एकटाच चालला होता. वनराईच्या सौंदर्यानं तो प्रसन्न झाला. आनंदला होता तो. स्वतःला विसरला. आपण अकबराचे सेनापती आहोत आणि शत्रूच्या मुलखात इतके बेसावधपणे फिरतो आहोत याचंही त्याला भान राहिलं नाही, त्या स्थितीत तो बेसावध असताना आमच्या सैनिकांनी त्याला गिरफ्दार केलं. म्हटलं असतं तर ज्या हत्तीवर तो दिमाखात बसला होता, त्याच्याच पायाखाली त्याचा दिमाख उतरविला असता आणि हाडांचं चूर्ण केलं गेलं असतं. नाहीतर तलवारीच्या एका फटकाऱ्या सरशी मस्तक धडावेगळं झालं असतं. पण शूर कधी बेसावध शत्रूवर हल्ला करीत नाहीत. शत्रूला सावध करून त्याच्याशी युद्ध करतात. म्हणून, केवळ आमच्या सांगण्यामुळेच सैनिकांनी त्याला जीवदान दिलं.

आम्हांला वाटलं होतं की या उपकाराची तो जाणीव ठेवील. आज आमच्या कृपेनं खरोखर त्याचा जीव वाचला याची स्मृती त्याच्या अंतःकरणात राहील. त्याकरिता अकबराला काहीतरी कारण सांगून ही मोहीम तो बंद करील. पण छे ! कृतघ्न...उपकारांचं स्मरण तर बाजूलाच राहिलं. उलट आमच्या कमकुवतपणावर नेमकं बोट ठेवून आमचा पराभव केला. आमचा डाव आमच्यावरच उलटविला. आमचं राज्य हिरावून घेतलं. आम्हांला वनवासी बनविलं.

पण यात मला वाईट वाटण्याचं काय कारण ? पांडवांना नाहीका वनवास सोसावा लागला. खरोखर महाकवीची प्रतिभा किती विलक्षण असते ! मोठेपणा प्राप्त करण्याकरिता आधी वनवास सहन करावा लागतो, हे कटू सत्य किती छान उदाहरणाने त्यांनी पटवून दिले आहे. त्यांना वनवासी व्हावं लागलं होतं, तरी त्यांनी आपलं ध्येय सोडलं नव्हतं. आम्हांलाही आमचं ध्येय सोडून चालणार नाही. मानसिंगावर

दया करण्याची चुकून जी चूक झाली ती झाली. आता आमचं सामर्थ्य आम्हांला वाढविलंच पाहिजे. कारण,

नुसत्याच सदिच्छेने राज्यं चालत नसतात
त्याला शस्त्रांचं सामर्थ्य असावं लागतं.

राज्य चालविताना बळी तो कान पिळी हाच न्याय खरा ठरतो, हेच खरं! आम्हांला आमचं सामर्थ्य लवकरच वाढविलं पाहिजे. जोपर्यंत आमच्या हातात तलवार आहे, आमच्या भाल्याला शत्रू रुधिराचीच ओढ लागली आहे, जोपर्यंत आमच्या नसानसात ज्वलंत रक्त सळसळत आहे, तोपर्यंत मातृभूमी स्वतंत्र करण्याकरिताच आमचे प्रयत्न होतील. त्यातच जीवनाची अखेर होईल. तेच आमचं ध्येय आहे. त्याकरिता आम्हांला श्रम केलेच पाहिजेत."

राण्यानं आपलं मनोगत पुन्हा पुन्हा आकाशांतील ताऱ्यांना ऐकवलं. गिरी गुहातील कणाकणांनी ते ऐकलं. निसर्गानं मंद झुळकेच्या मिषानं एक सुखद श्वास टाकला. राणा मोहरला.

आणि दुसऱ्या क्षणी...दुसऱ्याच क्षणी आपल्या मुलीच्या, हृदयाचा ठाव घेणाऱ्या, रडण्याने त्या योग्याची समाधी भंग पावली. विचाराची साखळी तुटली. त्या क्रंदनाच्या दिशेने भावनावेग जोराने वाहू लागला. असंख्य यातनांना तोंड देताना जो अचल होता, आपला पराभव आपल्या डोळ्याने बघताना जो स्थिर होता तो मेरू पर्वत आपल्या मुलीच्या आक्रोशाने हेलावला. ध्येयावर दृढ असणारा ध्रुव तारा ढळला. बर्फ जसं वितळून जातं तसा त्या करुण व्यथेने राणा वितळून गेला. तात्काळ त्यानं आपलं आसन सोडलं आणि आपल्या पर्णकुटीत प्रवेश केला.

दोन-चार मृत्तिका पात्रांच्यासह मेवाडची राणी आपल्या छोटच्या छोटच्या मुलांना घेऊन बसली होती. वद्य पक्षात सकाळी दिसणाऱ्या चंद्राप्रमाणे तिचा चेहरा म्लान दिसत होता. मुलीच्या ओरडण्याने

ती दुःखीत झाली होती. पण जवळ काही नव्हतं. लहान मुलांची समजूत करणं सोपं नसतं.त्यांना हवी असणारी गोष्ट जर त्यावेळेला ते म्हणतील तशी मिळाली नाही, तर शांत करण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ जातात.

मेवाडच्या राणीची तीच अवस्था झाली होती. छोटया मुलीला काय हवं आहे, हे तिला माहीत होतं, पण तिला ते देता येत नव्हतं. ज्याच्यावर अत्यंत प्रेम आहे त्याने मागितलेली छोटीशी गोष्टही जर आईवडिलांना देता आली नाही तर त्यांच्या हृदयाला किती यातना होत असतील याची कल्पनाच केलेली बरी ! मेवाड साम्राज्ञी हताश होऊन पहाण्या-पलिकडे काही करू शकत नव्हती. उदास मुद्रेनं ती क्षणभर रिकाम्या भांड्याकडे आणि क्षणभर रडणाऱ्या मुलीकडे पाहात होती. पण त्या मुलीशी बोलण्याची तिची हिम्मत मात्र झाली नाही.

राणा जवळ गेला. त्याने भुकेने सुकून गेलेल्या आपल्या मुलीला मांडीवर घेतलं. तिच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरविला. तिचं तोंड कुरवाळलं. त्या स्पर्शात प्रेमाची स्निग्धता होती. वात्सल्याचा अर्क होता. बोलकेपणा होता. मुलीला क्षणभर वरं वाटलं.

दुःखात पाठीवरून फिरविलेला प्रेमळ
हात दुःखाची जाणीव पुसट करतो.

मुलीला हुंदके आवरत नव्हते. त्या दृश्यानं राणाही भारावला. त्याच्या नेत्रांचाही बांध फुटला. एक साम्राट आपल्या मुलीच्या दुःखाने दुःखी झाला आणि आसवं ढाळू लागला. त्यानं विचारलं–

"बाळ ! बाळ, काय झालं ? का रडतेस ?"

मुलीनं रडत रडत बोवडया शब्दात सांगायला सुरवात केली –

"पिताजी ! आज ऽऽ आज मला खूप भूक लागली आहे. तहान तर केव्हा पासूनच लागली आहे. तर – आईनं मला एक . . . एक भाकरीचा तुकडा दिला आणि सांगितलं, जा तिथं बस आणि खा . . ."

" मग ! "

" मी तिथून उठले आणि इथं बसले. कोरड्या भाकरीचा एक घास खाल्ला आणि पिताजी . . . तुमी शिकविलं होतं ना ते ऽऽते मेवाडचं गाणं म्हणत होते. माझं लक्षच नव्हतं. तोच एक मांजर आलं आणि . . . "

पुढचे शब्द तिला सांगवेनात. राण्यानं परत तिला थोपटलं. आणि विचारलं–

" मग काय झालं ? सांग ना. "

रडत रडतच तिनं वाक्य पूर्ण केलं–

" आणि . . . आणि माझी भाकरी त्यानं पळविली. . . "

" बरं ! आम्ही आणखी देतो. मग तर झालं ना ? "

" नाही, पिताजी ! आई म्हणते आता भाकरी नाही. ती काहीच बोलत नाही. नुसतंच भांड्याकडे बघत वसते आणि रडते आहे. काहीच बोलत नाही. तुमीच सांगा ना ! "

राण्यानं पत्नीकडे पाहिलं. ती खाली मुख करून बसली होती. समोरची भांडी रिकामी होती आणि डोळ्यातल्या पाण्याचे थेंब झरझर खाली पडत होते. त्यानं आपली नजर परत फिरविली. काय करावं त्याला कळेना. कोणत्या शब्दात उत्तर द्यावं हे त्याला समजेना. एका आज्ञेसरशी कोणतीही गोष्ट समोर उभी करण्याची ज्याची ताकद त्याला आपल्या मुलीला भाकरीचा तुकडा देण्याकरिता इतका विचार पडावा ?

**दैवगती विचित्र असते. राजाला भिकारी आणि भिकाऱ्याला राजा करणं हे तिचे खेळ असतात.**

पण त्या दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून राजाचे जे भिकारी होतात, त्यांच्या मनाचा तिनं कधी विचार केला आहे का ? त्यातल्या त्यात आपल्या ध्येयाकरिता वेडे होऊन जे भिकेला लागतात, निदान त्यांच्या

मनाचा जरी तिने विचार केला असता तरी तिलाच करुणा येऊन तिनं हे असले चाळे बंद केले असते.

राण्याला आपल्या मुलीला काही तरी उत्तर देणे भागच होते. बोलण्याकरिता ओठ थरथरू लागले. शब्द अडखळू लागले, तोच त्याची मुलगी म्हणाली–

" पिताजी, तुम्ही राजे अहात ना ? मला माहीत आहे सारे लोक तुम्हांला महाराज म्हणतात. मी तुमची आवडती मुलगी आहे. तुम्ही राजे असून पिताजी तुम्हांला माझ्याबद्दल काहीच वाटत नाही. मला भाकरी पण तुम्ही देत नाही..."

" बाळ, बाळ काही बोलू नकोस..."

" पिताजी, मागे मी रडायला लागले की तुम्ही मिठाई देत होता. खाऊ देत होता आणि आज साधी भाकरी पण नाही.... सांगाना पिताजी..."

" बाळ..."

पुढचं राण्याच्याने बोलवेना. त्या शब्दानी तो घायाळ झाला. मनात म्हणाला, " काय ही आमची स्थिती ? लाडक्या मुलीला द्यायला घासभर रोटी नाही. कशाला आम्ही जगतो आहोत ?" तोच मुलगी पुन्हा बोलू लागली –

" पिताजी, "

" हं.– "

" तुम्ही का बोलत नाही मला माहीत आहे. शत्रूने आपल्या सेनेचा नाश केला. आपल्याला वनात पाठविलं–होय ना ? आई सांगत होती मला..."

राण्यानं पत्नीकडे पाहिलं. ती अधोवदनच होती.

" पिताजी, कोण आहे हो हा शत्रू ? त्यानं मलासुद्धा वनात

पाठविलं ? त्याला नाही का हो लहान मुलगी ? त्यानं आपल्याही मुलीला पाठवलं काहो वनात...?"

"बाळ काही बोलू नकोस..."

"सांगाना, मी लढू का त्याच्याशी ? मला तलवार द्या. मी मारते त्याला. द्याना मला तलवार..."

शेवटी राण्यानं तिच्या तोंडावर हात ठेविला. त्याला ते शब्द ऐकवत नव्हते. सगळीकडे निशब्द शांतता पसरली होती. काही वेळा शब्दांच्यापेक्षा निरामय शांतताच अधिक बोलकी बनते. अधिक जाचक ठरते. हृदयाला जास्त दुःख देते. राण्याचं मन शंकांनी काळवंडलं. मुलीच्या व्यथेने त्या धैर्यमेरूचा धीर खचला. तो दीन झाला. कुबेरा-सारखा श्रीमंत राजा आपल्या मुलीपुढे दीनाहून दीन झाला. दुःख सहन करण्यालाही काही सीमा असते. एका कक्षेपलीकडे कोणतंही दुःख सहन केलं जात नाही. करायची वेळ आली तर हृदय विदीर्ण होऊन जातं. त्याचे तुकडे तुकडे होतात.

आणि मग राण्याला उदासवाण्या विचारांनी घेरलं. निराशेनं वेढलं. खिन्नतेचे विचार त्याच्या मनात येऊ लागले. "हे काय स्वातंत्र्य आहे की, ज्याच्याकरिता लहान लहान मुलांना भुकेने तडफडून आपली आसवं वहावयाला लागावीत ? ज्याला आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करिता येत नाही तो देशाचे रक्षण काय करणार ? माझ्या पराक्रमाचा आता काही उपयोग नाही ... काही उपयोग नाही. मेवाड रक्षणाची माझी प्रतिज्ञा इतक्या मोलाची खास नाही. केवळ त्या प्रतिज्ञेपायी अनेक वीरांच्या रणात आहुत्या पडल्या; स्वामीनिष्ठ चेतक मला सोडून गेला; कितीतरी सौभाग्यवतींचे कुंकू माझ्यामुळे पुसले गेले व आयांना आपल्या मुलांचा चिरविरह सहन करावा लागला; मेवाड भकास झाला. मेवाडची ही हत्त्या थांबविण्याकरिता तरी मला माघार

घेतलीच पाहिजे.

**काही वेळा पुढच्या हितावर लक्ष ठेऊन घेतलेली माघारही लाभदायक ठरते.**

मला तेच केले पाहिजे."

राण्याचं दुसरं मन त्याला लगेच म्हणालं. "काय! माघार... रजपुतांनी आजपर्यंत कधी माघार घेतली नाही. आणि तू तर ध्येयनिष्ठ आहेस."

**ध्येयनिष्ठांनी 'माघार' हा शब्द आपल्या शब्दकोशात ठेवायचाच नसतो. तो शब्द जिभेवरसुद्धा घ्यायचा नसतो. ध्येयनिष्ठांचा मार्ग हा प्रगतीचाच असावा लागतो. तरच त्यांना ध्येय गाठता येतं.**

रजपूतांनी आत्मार्पणं केली आहेत. आपल्या प्रत्येक रक्तबिंदूंनी इतिहास घडविला आहे, पण माघार घेतली नाही. शतकानुशतके हसत हसत युद्ध खेळलेल्या मेवाडला 'माघार' हा शब्द सहनच होणार नाही. असलं पराभवाचं जिणं जगण्यापेक्षा मृत्यू काय वाईट? तुझे पूर्वज काय म्हणतील? त्यांना स्वातंत्र्य टिकविण्यासाठी काहीच श्रम पडले नसतील का? मग त्यांनी जर अनेक संकटांना तोंड देऊन इतकी वर्षे स्वातंत्र्य टिकविलं तर तेच स्वातंत्र्य पुढे टिकविणं हे तुझं कर्तव्य नव्हे का? राजा! कर्तव्यच्युत कधीही होऊ नकोस."

विचारांच्या हिंदोळ्यावर राणा सतत हेलकावे खात होता. आशा निराशेचा खेळ पाहात होता. तोच त्याला पुन्हा वाटलं. "कर्तव्यच्युत होण्याचा हा प्रश्न कोठे आहे? तात्पुरता तह करावा म्हणजे बादशहा गप्प बसेल आणि तो परत गेला की लगोलग आपलं सामर्थ्य वाढवून परत आपला प्रदेश जिंकून घ्यावा म्हणजे स्वातंत्र्य टिकेल."

याच विचाराने त्याला घेरले. संधीपत्रच लिहावं असं त्याला सारखं वाटू लागलं. नकळत त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडले. " संधी पत्र ! ... होय, अकबराला शरणागतीचा निरोप पाठविल्याशिवाय गत्यंतरच नाही... "

राण्याचं आपल्या मुलीकडे लक्ष गेलं. रडून रडून बिचारी केव्हाच झोपली होती. राण्याच्या मनातील विचाराची तिला कल्पनाही नव्हती. तिला राण्याने जवळच झोपविले.

राण्याने आपली जागा सोडली. निरोपाच्या पत्राकरिता कागद घेतला. तो लिहायला बसला. त्याने कागदाला लेखणी लावली नाही तोच त्याचा हात थांबविला गेला. त्यानं वर पाहिलं मेवाड साम्राज्ञी होती ती. तिनं हळुवारपणे विचारलं–

" नाथ ! काय करिता अहात आपण ? "

राण्याचे शब्द थोडा वेळ ओठातच राहिले. अडखळले. अस्पष्ट झाले. त्रुटित झाले आणि मग एक एका अक्षराने शब्द पुरा केला. मोठ्या कष्टाने तो म्हणाला–

" पद्मावती ! संधीपत्र. अकबरापुढे शरणागती... "

" आपण संधीपत्र लिहिणार ? आजपर्यंत अढळ रहाणारा तारा आज ढळणार ? मातृभूमीची सेवा करण्याचं आपलं व्रत आहे. तिला स्वतंत्र करणं हे आपलं ध्येय आहे आणि ... "

" खरं आहे ते ! पण यामुळे जर आपल्या लहान मुलांना धड खायला-सुद्धा मिळणार नसेल, अन्नाच्या एकेका कणाकरिता जर त्यांच्या अश्रूंच्या सरी भूमीवर पडणार असतील तर त्या सेवेचा उपयोग काय ? असलं ध्येय किती दिवस ठेवायचं ? आपण दुर्बल झालो आहोत. "

**दुर्बलांची मनोराज्यं मनातल्या मनात निर्माण होतात**
**आणि मनातल्या मनातच विराम पावतात.**

" असं का म्हणता आपण ? जोपर्यंत आपलं मन कणखर आहे, त्यात जिद्द आहे, तोपर्यंत आपण कधीच दुबळे ठरणार नाही. आपण मेवाडचे भाग्यविधाते आहात. मानवांचं जीवन आहात. आपल्याकडे डोळे लावून तर अजूनपर्यंत रजपूत स्त्रिया अभिमानानं जगत आहेत. आपणच मेवाडचे सर्वस्व अहात. आपणच अशी भाषा बोलायला लागल्यावर बिचाऱ्या मेवाडनं बघायचं तरी कोणाकडे ? "

" म्हणून तर आजपर्यंत अठरा वर्षे आम्ही हे कष्ट सहन केले. ही दशा त्याच्याचमुळे तर निर्माण झाली आहे. पण आज वाटायला लागलं आहे की, आमची प्रतिज्ञा एवढ्या मोलाची खास नाही की, ज्याच्याकरिता हजारो रजपुतांनी आपले प्राण द्यावेत. थोर वीरांनी आपलं बलिदान करावं आणि..."

" आणि म्हणूनच म्हणते की, आपल्याला संधी करायचा कितपत अधिकार आहे ? आज अनेक आयांनी आपले पोटचे गोळे देशाकरिता दिले. कित्येक रमणींचे कुंकुम तिलक देशासाठी पुसले गेले. त्यांना एक वेळ हा अधिकार आहे. आपल्याला नाही. स्वातंत्र्याकरिता ज्यांनी आपला प्राण दिला आणि आपल्याला वाचविलं ते काय अकबराशी संधी करण्यासाठी ? चेतकाने आपल्या जीवाची पर्वा न करिता रक्षण केलं ते काय आपण पुढं शरणागती पत्करावी याकरिता ? मेवाडचं रक्षण करणं आपल्याला जर जमत नसेल तर माझ्या हातात तलवार द्या मी रणचंडी बनेन. मी दुर्गामाता बनेन आणि मेवाडचं रक्षण करीन. पण आपण तहाची कल्पनाही मनात आणू नका. नाथ, नीट विचार करा आपण हे काय करीत अहात ? आणि कशासाठी ?..."

" पद्मावती..."

" रागाच्या भरात बोलले म्हणून क्षमा करा मला. आपल्याला टोचून बोलावं म्हणून मी बोलले नाही. पण राहावलं नाही म्हणून बोलले. चुकलं माझं ! "

" पद्मावती, काय बोलतेस हे ! चुकलं तुझं नाही, आमचंच चुकलं. आम्ही रागावलो नाही.

साठलेली राख विस्तवावर फुंकर मारल्याशिवाय दूर जात नाही. आमचं ध्येय आम्ही विसरत चाललो होतो. आमचा मार्ग आम्ही विसरत चाललो होतो. आता तसं होणार नाही. आमचं ध्येयं आम्ही निश्चित पूर्ण करू. पुन्हा आम्हांला आत्मविश्वास वाटायला लागला आहे. शाब्बास, मेवाड साम्राज्ञी ! तुमच्यासारखी राज्ञी मिळाल्यामुळे आमचं जीवन धन्य झालं आहे... खरोखर धन्य झालं आहे."

पद्मावतीच्या नेत्रातून अश्रू ओसंडत होते. एकात होते आनंदाश्रू आणि दुसऱ्यात दुःखाश्रू !

राण्यानं चंद्रमौळी झोपडीतून सहज वरती पाहिलं. आकाशातल्या चांदण्यातून त्याला रजपूत वीर दिसत होते, चेतक दिसत होता. सारे सांगत होते. " ध्रुवताऱ्या, ढळू नकोस. अंतिम यश तुझंच आहे. ही कसोटीची वेळ आहे. याला सामोरा जा. प्रयत्न कर. यशश्री तुलाच माळ घालणार आहे." हा दिव्य संदेश त्याच्या कानावर आदळू लागला. क्षणभर राणाच्या चेहऱ्यावर आनंदाची छटा तरळली.

तोच पावलांचा आवाज झाला. पाचोळा पायाखाली चुरचुरला. काही भिल्ल धावतच येऊन सांगू लागले–

" राणाजी ! घात झाला. शत्रूनं आपल्याला वेढलं आहे. अंधारातच दूर निघून गेलं पाहिजे."

राण्यानं क्षणाचाही विलंब लावला नाही. भुकेने रडून रडून झोपलेल्या आपल्या मुलांना भिल्लांनी खांद्यावर घेतलं. भिल्लांच्या मदतीनं छपत छपत मेवाडाधिपती अंधारात दूर निघून गेला. शत्रूंच्यापासून दूर ! सुरक्षित जागी ! !

रात्र संपत आली होती. शेवटचा प्रहर चालला होता. वाऱ्याची

वा. क्र. ९२.०८५५



गती वाढली होती आणि थंडीचा कडाकाही. राणा आपल्या परिवारासह एका वृक्षाखाली उभा होता. भोवताली रक्षणाकरिता काही भिल्ल होते. विचारक्रांत झालेल्या राणाप्रतापने सांगितले–

" मघाशीच आम्ही निश्चय केला होता की, अकवराशी लढायचं. विजय मिळवायचा. स्वातंत्र्य रक्षणाचं ध्येय गाठायचं पण ते ध्येय आता इथं वसून गाठता येणार नाही. कारण मेवाड आम्हांला तिळभर सुद्धा सुरक्षित जागा देऊ शकत नाही. येथला प्रत्येक क्षण धोक्याचा आहे. आता पुढचे बेत आखायचे ते मेवाडच्या भूमीतून आखता येणार नाहीत. आता मेवाड आम्ही आत्ताच सोडणार आणि बाहेर राहूनच काय करिता येईल ते करणार आहोत."

भिल्ल बिचारे फक्त ऐकत होते. गेली अठरा वर्षे काय थोडी परवड चालली होती. ही त्यांना माहीत होती त्यामुळेच ' होकार ' आणि ' नकार ' यांच्या सीमारेषेवर त्यांची मनं रेंगाळत होती. राण्याला वेळ नव्हाता. त्याने पत्नीला आणि मुलांना निघण्यास सांगितले.

राण्याचे नेत्र भरून आले. त्याने मातृभूमीकडे पाहिले. आपला मुकुट काढून तिला नमस्कार केला, पद्मावतीनंही मान खाली लववून नमस्कार केला. शब्दाशिवाय काही तरी मागणं मागितलं. कोणतं मागणं मागितलं हे तिचं तिलाच ठाऊक ! रडत रडत लहान मुलांनीही आईचंच अनुकरण केलं. निघण्याची तयारी झाली. पुढे वाटाडे भिल्ल, मागे राणी, मुले आणि शेवटी राणा प्रताप ! राणा मातृभूमी सोडून निघाला. तिच्या हिताकरिता, तिचा त्याग करून निघाला.

रात्र जवळजवळ संपली होती. प्रभातकालचा अस्पष्ट प्रकाश पसरत होता. एक . . . . एक पाऊल पुढे पडू लागले. पाचोळा दबू लागला आणि पुन्हा पावलांचा आवाज झाला. जोराने पुढे येणारा. साऱ्यांच्या छातीत धस्स झालं. क्षणभर सारे थवकले. धडधडत्या हृदयाने !

काही क्षणातच ती व्यक्ती पुढे आली. " राणा प्रताप की जय " अशी घोषणा तिनं केली. राण्याला कळेना की आपण स्वप्नात आहोत की जागे ? आवाज ओळखीचा वाटला. अंधुक उजेडांत त्यानं त्या व्यक्तीला ओळखलं. तो मेवाडचा वृद्ध मंत्री होता. भामाशाह ! त्यानं धावत जाऊनच राणाच्या पायाला मिठी मारली. अश्रूंनी त्याचे पाय भिजविले. राणानं त्याला वर उठविलं आणि विचारलं –

" भामाशाह ! इथं ? आणि अशा वेळी ? "

" राजा ! तुझी सारी हकीगत मी ऐकत होतो, पण तुझा पत्ता लागत नव्हता. शत्रूच्या जबरदस्त सैन्याला चुकवून तुझ्या दर्शनाला यायला जमलंच नाही. आज मोठ्या प्रयासानं तुझ्यापाशी आलो. "

त्याचं शरीर थरथर कापत होतं. थंडीतसुद्धा त्याच्या अंगातून घाम येत होता. बोलताना त्याला धाप लागली होती. काही काळ स्वस्थ बसल्यावर राण्यानं पुन्हा विचारलं–

" माझ्यापाशी ! आता काय काम आहे ? मी तर आता मेवाड सोडून जात आहे. इथं राहून लढण्याची आता माझ्याकडे शक्ती नाही."

" राजा ! तू मेवाड सोडणार ? मेवाड सोडू नकोस. तो तुला सोडता येणार नाही. या बंदी मेवाडला, परतंत्र मातेला केवळ तुझाच आधार आहे. राजा, तुझाच आधार आहे. तूच तिला स्वतंत्र केलं पाहिजेस. त्याचकरिता, माझी सेवा अर्पण करण्यासाठी मी इथं आलो आहे. "

भामाशहाने आपल्याबरोबर आणलेल्या थैल्यांचे बंद सरकावले. सोन्याची रास राण्याच्या पायावर ओतली. ती पहाताच राण्याचे डोळे चमकले. त्याच्या शरीरातून विद्युतरेखा चमकून गेली. नवा उत्साह आला. चैतन्य सळसळायला लागलं. कोमेजलेला चेहरा टवटवीत झाला, ते पाहून भामाशहाला कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं तो म्हणाला–

"राजा ! माझ्या आयुष्याची सारी कमाई आज देशाच्या चरणी मी अर्पण करतो आहे. पंचवीस हजार सैनिक बारा वर्षे लढतील एवढी ही संपत्ती आहे. हिचा उपयोग कर आणि देश स्वतंत्र कर. तुझ्याभोवती उद्याची सारी सुंदर स्वप्ने मी पाहात आहे. हिचा तू स्वीकार कर."

"भामाशाह......आपली आयुष्याची कमाई, मी ती कशी घेऊ ? ..."


"राजा, देश जर स्वतंत्र राहिला, आपलं स्वातंत्र्य जर टिकलं तरच माझं अस्तित्व रहाणार आहे. मी देशाकरिता ही संपत्ती देतो आहे. योग्य माणसाच्या हाती देतो आहे. तू ध्येयनिष्ठ आहेस. ध्येयाचा मानदंड आहेत. राजा, तूच हिचा योग्य उपयोग करू शकशील. घे. कोणताही विचार मनात न आणता, देशाकरिता ही घे."

अभिमानानं राण्यानं संपत्तीच्या राशीकडे बघितलं. सूर्याचे कोवळे किरण त्यावर पडले होते. सोनेरी सूर्य किरणांनी सोन्याला शोभा आली होती का सोन्याच्या संपर्काने सूर्यकिरण शोभत होते, हे सांगता येणं कठीण होतं. प्रभातकाळचं वातावरण प्रसन्न होतं. नव्या दिवसाचं स्वागत सृष्टी नव्या जोमानं करीत होती. राण्यालाही प्रसन्न वाटत होतं. सोनेरी किरणांनी प्रतापच्या डोक्यावर जणू मुकुट चढविला होता आणि सांगितलं होतं की 'राजा, आज आम्ही तुला वनातच राज्याभिषेक करीत आहोत.' रात्र संपली होती. भाग्याची प्रभात उदय पावली आहे. दरी दरीतून पक्षी जणू काही मेवाडचं आणि राण्याचं विजयगीत गात होते. राण्याची नजर समोर गेली. समोर विस्तीर्ण सरोवर होतं. सरोवरातील कमळं खुलली होती. फुलली होती आणि भृंगे बंधमुक्त झाले होते.

या साऱ्या दृश्याने राण्याला नवीन उत्साह वाटू लागला. तो भामाशहाला म्हणाला –

" भामाशाह ! मेवाडची इच्छा आहे त्याच प्रमाणं होईल. आम्ही या लक्ष्मीचा स्वीकार करतो आहोत. ही लक्ष्मी मेवाडला भाग्याची ठरो. आता मेवाड लौकरच स्वतंत्र होईल यात शंकाच नाही. जगातली कोणतीही शक्ती प्रतापला त्याच्या ध्येयापासून दूर लोटू शकणार नाही. आम्ही आमचं ध्येय आता निश्चित पूर्ण करणार. "

प्रतापचा निश्चय ऐकून वृद्ध मंत्र्याला आनंद वाटला. त्याच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. त्याने समोर राण्याकडे आणि राणीकडे बघितलं. त्याच्याच मनाचं प्रतिबिंब त्याला दोन्ही ठिकाणी दिसलं. आनंदानं राण्याचा निरोप घेऊन तो निघाला. निघताना त्याच्या चेहऱ्यावर प्रकाश आणि अंतरंगात आनंद नाचत होता. दूर जाणाऱ्या मंत्र्याकडे राण्यानं अभिमानानं पाहिलं. पद्मावतीकडे आणि सोन्याच्या राशीकडे, छे, भाग्यलक्ष्मीकडे त्याने कृतार्थतेने पाहिलं. मस्तक खाली झुकवून वंदन केलं आणि आत्मानंदातच त्याने आपल्या हातातली तलवार मेवाड रक्षणाकरिता म्यानातून बाहेर काढली.





# ध्येयनिष्ठेची पूर्तता

“ मराठ्यांच्या कुळात जन्माला येऊन पैशाकरिता भीक मागत हिंडण्याची लाज नाही वाटत ? जवळ पैसे नसताना शिकावे कशाला ? गुरे राखावीत ! चल जा, चालता हो येथून. ”

डॉ. शेळक्यांचे शब्द विठ्ठलरावांच्या कानात उकळत्या तेलाप्रमाणे घुसले. जळत्या निखाऱ्यांचा पाऊस तर पडत नाहीना असे त्यांना वाटले. अपमानाच्या शब्दांच्या असंख्य इंगळ्या त्यांच्या मनाला डसत होत्या. डॉक्टर शेळक्यांच्या दवाखान्याच्या पायऱ्या भराभरा उतरून त्यांनी आपल्या खोलीचा रस्ता धरला.

पावलं भराभर खोलीकडे पडत होती. शून्य आणि भकास डोळ्यांना भोवतालचं जग दिसत नव्हतं. भोवतालचे आवाजही ऐकू येत नव्हते. ऐकू येत होते फक्त डॉ. शेळक्यांचे शब्द ! नुसतेच ऐकू येत नव्हते तर कानात घुमत होते. “ पैसे नाहीत तर शिकावे कशाला ? गुरे राखावीत. ” “ खरंच. मी हा आटापीटा का करतो आहे ? गरिबांनी

फार मोठं ध्येय उराशी बाळगू नये. बाळगलंच तर त्याचा परिणाम हा असाच होणार. बरं, ध्येय बाळगलं तर हरकत नाही पण मी पैशाकरिता हात कशाला पसरले? मोलमजुरी केली असती तर हक्कानं पैसे मिळाले असते. हा अपमान सहन करावा लागला नसता. आता हवे असलेले पैसे मी कसे जमा करायचे? माझं ध्येय तर राहिलं क्षितीजापलीकडे आणि माझे पंख तर आत्ताच गळून पडले. आता तिथं पोहचायचं कसं? कॉलेजचं पहिलं वर्षही पार पडणार नाही. सगळे, सगळे उद्योग सोडून देऊन जमखिंडीला परत जावं लागणार आणि तिथं गेल्यावरही मायेचा शब्द मिळणार नाही. सारे लोक हसतील. छी: थू करतील. "पैसे नव्हते, सोय नव्हती तर पुण्याला गेलाच कशाला हात दाखवून अवलक्षण करायला?" असली काहीतरी बोलणी ऐकावी लागतील. जग हे असंच असतं. यशस्वी लोकांचेच ते पोवाडे गातं. स्तुती करतं. पण प्रयत्न करूनही अपयशी झालेल्या लोकांच्या तोंडावर मात्र ते थुंकतं. यश मिळालं नाही म्हणून प्रयत्नांचं मूल्य कमी होत नाही, हे जगाला कधी कळणार आहे कुणास ठाऊक?"

एक ना अनेक विचार विठ्ठलरावांच्या मनात गर्दी करीत होते. प्रचंड वादळाने सागरात लाटांचे तांडव चालावे तसं मनाच्या सागरावर परिस्थितीच्या वादळानं विचारांचं तांडव चाललं होतं. त्यामुळेच रस्ता किती संपला याकडे त्याचं लक्ष नव्हतं. पायांना मात्र रस्ता ओळखीचा होता. त्यांनी विठ्ठलरावांना खोलीवर आणून सोडलं. सवयीप्रमाणे हातांनी दार उघडलं आणि आत गेल्यावर परत दार लावून ते त्याच उदास खिन्न मनस्थितीत आपल्या खोलीत बसून राहिले.

विचारांचं वादळ अजून शमलं नव्हतं. नदीच्या भोवऱ्यात सापडलेली नाव पुन्हा पुन्हा तिथंच येते, तसं त्यांच्या मनाचं झालं होतं. त्यांचं मन पुन्हा पुन्हा त्याच विचारांशी रुंजी घालीत होतं. "आपण इथं

येण्यात उतावीळपणा केला. इथं येताना पूर्ण विचार केलाच नव्हता," असं त्यांना वाटलं. आणि या विचारासरशी त्यांचं मन एकदम जमखिंडीच्या आपल्या मोडक्या, जुन्या घराशी गेलं. त्यांच्या डोळ्यासमोर तेव्हापासून ते आजपर्यंतचे सारे प्रसंग फेर धरून नाचू लागले. ते मॅट्रिक पास होऊन पुण्याला यायला निघाले होते, त्यावेळी त्यांची आई त्यांना म्हणाली होती–

"विठू, अरे इतका शिकलास, पुरे झालं बाबा तुझं शिकणं. आता कुठे तरी नोकरी लागेल ती कर आणि आपला सुखात राहा."

विठ्ठलरावांनी आपला शिक्षणाचा हट्ट त्यांना सांगितला. ते म्हणाले–

"आई, मला खूप शिकायचं आहे. मोठं व्हायचं आहे. मी शिक्षण घेण्यासाठी जात आहे, अशा वेळी तू मला आशीर्वाद द्यायला पाहिजे, मला आनंदानं निरोप द्यायला पाहिजे. पण तू तर आपली माझ्या शिक्षणात अडथळेच आणते आहेस. मी पुण्याला जाऊन बी. ए. पर्यंत शिकणार आहे. जमलं तर पुढे वकीलही होणार आहे."

"अरे बाबा, तुझं सारं ठीक आहे. पण तिथं आपली ना ओळख ना पाळख! बरं, आपल्याजवळ नाही पैसा. 'इकडचं' कसं चालतं हे तुला माहीत आहेच. मग तिथं तू काय करणार आणि कसा शिकणार?

**गरिबांनी फार मोठी अपेक्षा ठेवू नये. आकाशातल्या चांदण्या खुडायची इच्छा असली तरी पाय मात्र जमिनीवरच ठेवावेत."**

"आई, तूच मला लहानपणी गोष्टी सांगायचीस ना की, चांगलं काही करायचं असलं की कितीही संकटं आली तरी डगमगू नये. डोळ्यासमोर मोठं ध्येय ठेवावे. ते गाठण्याचा प्रयत्न करावा.

**मोठं ध्येय ठेवून त्यात अपयश येणं हे ध्येयशून्य जीवनापेक्षा केव्हाही श्रेष्ठच आहे. हिमालयावर ठेच लागून पडणारा माणूस हा जमिनीवरून ताठपणाने चालणाऱ्या माणसापेक्षा उंचावरच असतो. माणसाने प्रयत्न करावेत. यश मिळतंच."**

"हो, खरं आहे बाबा ते, पण..."

"आता पण कसला? ध्रुवाची गोष्ट तूच सांगितली होतीस ना? त्याचं अढळपद प्राप्तीचं ध्येय किती मोठं, भव्य होतं. अनेक संकटांना तोंड देऊन त्याने ते प्राप्त केलेच ना? मग मीही तसंच करीन. संकटांना तोंड देईन काबाडकष्ट करीन आणि माझं ध्येय मी पूर्ण करीन."

त्यांच्या आईला या सगळ्या प्रश्नांना पटतील अशी उत्तरे देता येणे कठीण होते. तथापि मातृप्रेमामुळे ती म्हणाली–

"विठू, त्या सगळ्या पुराणातल्या गोष्टी आहेत. साऱ्याच का खऱ्या असतात?

## तत्त्वज्ञान आणि व्यवहार यात फरक असतो

कसं कळायचं तुला?"

"आई, उदात्त आणि मोठी तत्त्वं आपल्या जीवनात आचारायची असतात म्हणून तर आम्ही श्रेष्ठ लोकांचं जीवन डोळ्यासमोर ठेवतो. आई, तू सांगितलेल्या कथेतील ध्रुव, एकलव्य, कृष्ण, शिवाजीमहाराज हे माझे आदर्श आहेत. ते ध्येयनिष्ठ जीवन जगले आहेत. त्यांनी अनेक संकटांना तोंड देऊन विजय संपादन केला आहे. संकटांना तोंड देण्यातच खरा पुरुषार्थ असतो. मी त्यांच्याप्रमाणे खडतर तपश्चर्या करण्यास तयार आहे. अग, कष्ट करण्याची तर मला सवय आहेच आणि संकटं तर आपली परीक्षाच बघत असतात, आई, तुला आठवतो तो प्रसंग!..."

" कोणता रे ? "

" त्या दिवशी घरात सरपण नव्हतं. बाबा घरातच बसले होते; पण तू त्यांना सांगितलं नाहीस. मला बोलावलं. मी हातातलं पुस्तक टाकून धावतच तुझ्याकडे आलो आणि विचारलं–

" काय आई ? "

तू सांगितलंस,

" विठू, सरपण आहे का बघ रे. अंगणात वगैरे असेल कोठे तरी. "

मी खूप शोधलं पण मला सापडलं नाही. शेवटी नाईलाजानं मी तुला विचारलं–

" आई, कोठेच सरपण सापडत नाही ग ! आपल्या मोडक्या खोल्यांचे वासे आणू का ? "

तुझे डोळे एकदम अश्रूंनी भरून आले. त्याच स्थितीत मानेनंच तू मला परवानगी दिलीस आणि म्हणालीस, ' देवा ! किती अंत पाहणार आहेस. चिमण्याराजांना पोटभर खायलासुद्धा देता येत नाही. का असा माझा छळ करतोस ? ' ते शब्द तू अगदी अस्पष्ट म्हटले होतेस, पण मी ते ऐकले होते. मलाही खूप वाईट वाटलं तरी त्यावेळी मी काय करणार होतो ?

त्याच दिवशी मला शाळेत दरमहा एक रुपयाची स्कॉलरशिप मिळाली. किती आनंद झाला मला त्यावेळी ! मी तो रुपया लगेच तुला आणून दिला. त्यावेळी तू मला छातीशी कवटाळून म्हणालीस,

' विठू, शहाणा आहे बाळ. मोठा हो. खूप खूप शीक आणि आईबापांचे पांग फेड बाबा. देव तुला चांगली बुद्धि देईल. '

' आई ! तो प्रसंग तू विसरली असशील, पण मी कसा विसरेन ? तुझ्या इच्छेप्रमाणेच मी पुढे शिकायला जात आहे. मग जाऊ ना मी ? देणार ना मला आशीर्वाद ? '

" मोठा गोड बोलतोस बघ तू. तुझं बोलणं ऐकलं की नाही म्हणताच येत नाही बघ ! बरं, जा. यशस्वी होऊनच ये. "

त्यानंतर लगेचच विठ्ठलराव पुण्यास यायला निघाले. जाण्यापूर्वी त्यांनी आपले शिक्षक श्री. वासुदेवराव चिरमुले यांना आपल्या निश्चया-बद्दल सांगितले. आपुलकीने चौकशी करून त्यांनी विठ्ठलरावांना योग्य मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले—

" पुण्याला जा. तिथं ' डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी ' आहे. त्यांच्यातर्फे गरीब होतकरू मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळते. श्री. म्हस्के नावाचे कोणीतरी गृहस्थ त्याचे प्रमुख आहेत. त्यांना भेटून तुझी सारी परिस्थिती सांग. ते तुला निश्चित मदत करतील."

विठ्ठलरावांना प्रकाशाचा तेवढाच एक किरण होता. बाकी सगळी-कडे अंधार होता. त्यांना पुण्याचे दर्शन दुसऱ्यांदा घडत होते. मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी ते प्रथम पुण्यात आले होते, पण त्या वेळी पाच-सहा दिवसच ते होते. त्यावेळी संपूर्ण पुण्याचे दर्शन असे घडलेच नव्हते ; म्हणून खऱ्या अर्थाने पुण्यासारख्या शहरात ते प्रथमच आत्ता राहाणार होते.

पुण्याच्या घडलेल्या पहिल्याच दर्शनाने ते भांबावले. घाबरले. बावरले. तरीही प्राप्त परिस्थितीत पुढे जाणे भागच होते. त्यांच्या शिक्षकाच्या ओळखीने त्यांना सदाशिव पेठेत फडतऱ्यांच्या वाड्यात राहाण्यास जागा मिळाली. जागेचा प्रश्न सुटला तरी इतर प्रश्न उभे होतेच ! पुण्यात शिक्षणासाठी राहावयाचे म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. कॉलेजची फीच दरमहा पाच रुपये होती. खानावळ पाच रुपये आणि इतर खर्च ! इतके पैसे जमा करायचे कसे ? विठ्ठलरावांनी यावर बराच विचार केला. परिस्थितीने गांजलेला गरीब माणूस विचार करण्यापलीकडे काहीच करू शकत नाही. त्यांच्या डोळ्यासमोर फक्त म्हस्केसाहेबांचेच नाव तरळत होते.

दुसऱ्याच दिवशी सकाळी त्यांनी म्हस्केसाहेबांचा पत्ता शोधून काढला. ते लष्करात राहात होते. म्हस्केसाहेब म्हणजे त्या वेळचे एक बडे प्रस्थ होते. नामांकित वकील म्हणून त्यांची प्रसिद्धी तर होतीच पण शिक्षणाला मदत करणारा एक दिलदार मराठा गृहस्थ अशी ख्यातीही त्यांनी मिळविली होती. एवढ्या मोठ्या गृहस्थास भेटण्याचा विठ्ठलरावांच्यावरचा हा पहिलाच प्रसंग होता.

बंगल्यात पाऊल टाकल्यावरच त्यांच्या रुबाबदार आणि श्रीमंत राहणीची जाणीव त्यांना झाली. विठ्ठलरावांनी त्यांच्या दिवाणखान्यात पाऊल टाकले. तेथले फर्निचर, उंची वस्तू, गालीचे आणि बसण्याच्या अद्ययावत् पद्धतीच्या खुर्च्या हे सर्व पाहून त्यांचे डोळे दिपून गेले.

**श्रीमंतीच्या झगझगाटापुढे गरिबी न कळत मान तुकविते. ते तेज तिला सहन होत नाही.**

म्हस्केसाहेब आपल्या दिवाणखान्यात विलायती चिरूट ओढीत बसले होते. चिरुटातून निघणाऱ्या धूम्रवलयाकडे पहात कसला तरी विचार ते करीत असावेत. मधून मधून त्यातली राख ते समोरच्या टेबलावरच्या रक्षापात्रात झटकत होते आणि पुन्हा त्यांचा कार्यक्रम सुरू करीत होते. ती मूर्ती पाहिल्यावर विठ्ठलरावांच्या मनात अनेक विचार येऊन गेले. मनाचा हिय्या करून त्यांनी म्हस्केसाहेबांना नमस्कार केला. त्यामुळे त्यांची तंद्री भंग पावली. नमस्काराचा स्वीकार करीत त्यांनी विचारले–

"कोण ? कोठला तू ?"

"माझं नाव विठ्ठल शिंदे. जमखिंडीहून कॉलेजच्या शिक्षणाकरिता आलो आहे."

"बरं, मग ? माझ्याकडे काय काम आहे ?"

इतकं तुटक बोलल्यानंतर आपलं काम आणि आपल्या अडचणी सांगाव्यात किंवा नाही ? सांगितलं तर काम होईल का ? अशा अनेक शंका त्यांच्या मनाला भेडसावू लागल्या. तरीही त्यांनी सांगितलं—

" मी गरीब आहे. शिक्षणाकरिता काही मदत मिळाली तर. . ."

" वडील आहेत का ?"

" होय."

" काय करतात ते ?"

" जमखिंडीलाच कारकून होते. आता घरीच असतात. सध्या ते काहीच करीत नाहीत."

" अरे, मग तू शिकण्यापेक्षा नोकरी का करीत नाहीस ? अनेसा तू मॅट्रिक पास आहेसच, नोकरी लावून देऊ का ? आज तुझ्या वडिलांना तुझ्या शिक्षणापेक्षा नोकरीची आवश्यकता असेल ! म्हणत असशील तर नोकरी देतो."

" मी जमखिंडीहून शिक्षणाकरिता येथे आलो आहे. नोकरीकरिता नाही. पुढे शिक्षण घ्यायचं हे माझं ध्येय आहेच. ते साध्य करण्याकरिता आपण मदत दिलीत तर ती फक्त हवी आहे. नाही तर मी माझं ध्येय पूर्ण करणार आहेच. "

" शाब्बास ! मग तुझ्यासारख्या मुलांना निश्चितच मदत मिळेल. काय शिकायची इच्छा आहे ? "

" आर्टस् कॉलेजमध्ये जाऊन बी. ए. होणार आहे आणि पुढे संधी मिळाली तर वकील होण्याची इच्छा आहे. "

" ठीक आहे. दरमहा दहा रुपये स्कॉलरशिप मिळेल. दरवर्षी पास झाले पाहिजे एवढी अट मात्र ध्यानात ठेव."

जास्त चवकशी नाही. आपुलकी नाही. फार आस्था नाही. एकदम

निर्णय! घटकान् घटका आपुलकीनं चौकशी करणाऱ्या खेडेगावातल्या माणसांच्यापेक्षा त्यांना हा प्रसंग अगदीच नवीन होता. जास्त बोलणे शक्य नव्हते. नाहीतर मिळालेली स्कॉलरशिप रद्द व्हायची. ते काहीही न बोलता घरी येण्याकरिता निघाले.

रस्त्यातून घरी जात असताना पुन्हा विचारांनी त्यांना ग्रासले. दहा रुपयात महिना भागणार कसा ? पुष्कळ विचार केल्यानंतर त्यांना एक उपाय सुचला. त्यांनी ठरविले की, कॉलेजचे प्राचार्य आगरकर यांची उद्या सकाळीच भेट घ्यायची. त्यांना सारी हकीगत सांगून कॉलेजची फी माफ करण्याचा प्रयत्न करायचा. आत्तापर्यंत एवढं जमलं आहे, तेव्हा ही एकच गोष्ट जमली तर मग निर्वेधपणे शिकता येईल.

दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यांचे पाय प्राचार्य आगरकरांच्या घराकडे वळले. फर्ग्युसन कॉलेजच्या आवारातच ते राहात होते. अंगणात सकाळचे ऊन घेत बसले असतानाच विठ्ठलराव आत आले. अदबीनं समोर उभे राहून त्यांना नमस्कार करून फी माफीचा अर्ज त्यांनी त्यांच्यापुढे केला. आपल्या खोल गेलेल्या पण भेदक नजरेनं त्यांनी प्रथम विठ्ठलरावांच्याकडे आणि मग त्या अर्जाकडे दृष्टी टाकली. आणि विचारले—

"तुला स्कॉलरशिप मिळतेना ?"

"होय सर."

"मग तुझी फी माफ होणार नाही."

"सर, पण मी गरीब आहे. माझ्याकडे फी पुरतेही पैसे नाहीत."

"ज्यांना स्कॉलरशिप मिळते त्यांना नियमाप्रमाणं फी माफ करता येत नाही. मी काहीच करू शकत नाही."

विठ्ठलरावांचा नाईलाज झाला. आशेचा तंतू तुटला. जे घडावं

असं वाटत होतं ते घडलं नाही. पुन्हा निराशा ! काय करावं हा प्रश्न पुन्हा उभा राहिला होता.

**ध्येयनिष्ठ लोकांना संकटांच्या काटेरी**
**मा र्गा व रू न च चा ला वं ला ग तं.**

शांतपणे ते खोलीवर आले.

अशा परिस्थितीत एखादा सामान्य माणूस असता तर त्यानं हे सारं टाकून घरचा रस्ता धरला असता. विठ्ठलरावांनी विचार केला.

" आपण एका निश्चयाने, ध्येयाने प्रेरीत होऊन पुण्यात पाऊल टाकले आहे. अपयशाने खचून जाण्याकरिता नाही. काय वाटेल ते झालं तरी शिक्षण सोडायचं नाही.

**असंख्य संकटांच्या आपत्ती आल्याशिवाय**
**सद्‌गुणांची संपत्ती उजळत नसते.** "

दहा रुपयात महिना काढायचा म्हणजे काटकसर आवश्यक होती. पैकी पाच रुपये फीचे निश्चितच जाणार होते. राहता राहिली खानावळ ! विठ्ठलरावांनी विचार केला, " खानावळीत जाण्यापेक्षा हातानेच स्वयंपाक केला तर रुपाया-आठ आण्यांची बचत होईल. " म्हणून खानावळीत जाण्याऐवजी त्यांनी घरीच हाताने स्वयंपाक करण्यास सुरुवात केली.

**ध्येयनिष्ठ माणसांनी ध्येयपूर्तीकरिता कोणत्याहि**
**हालअपेष्टा सहन करायला मागे पुढे पाहू नये.**
**येणाऱ्या प्रत्येक संकटाला सिद्ध असावं लागत.**

अशा स्थितीत त्यांचं कॉलेजचं शिक्षण सुरू झालं. कॉलेज जीवन सुरू झालं.

> कॉलेज जीवन ! किती रम्य कल्पनांची पखरण त्या जीवनाभोवती गुरफटलेली असते. शाळेच्या चौकटबद्ध जीवनातून मुक्त होऊन मोकळ्या वातावरणात स्वैर संचार करायला लावतं ते कॉलेज जीवन ! कल्पनेवर आरूढ होऊन स्वप्नाळू जगात विहार करायला शिकवतं ते कॉलेज जीवन ! "काव्यमय जीवन" जगण्याचं ध्येय डोळ्यासमोर ठेवायला लावत ते कॉलेज जीवन ! फुलपाखरांच्या सारखं विविध रंग लेऊन, कळ्या-फुलांच्या संगतीत, अनेक रंगांची लज्जत चाखण्याची स्वप्नं डोळ्यापुढं तरळत ठेवतं ते कॉलेज जीवन ! कोणाचंच बंधन नसलेलं जीवन जगायला सांगतं ते कॉलेज जीवन ! !

पण हे कॉलेज जीवन श्रीमंत लोकांच्याकरिता असतं. मौजेनं कॉलेजच्या पायऱ्या चढणाऱ्या गुलहौशी तरुण-तरुणींच्याकरिता असतं. विद्येच्या खऱ्या उपासकांना मात्र तेच कॉलेज जीवन वेगळी जाणीव करून देतं. साऱ्या जीवनात निराळाच अर्थ भरतं. तेच कॉलेज जीवन पण किती वेगळं वाटतं त्यांना ? त्यांना वाटतं –

> "छोट्या जीवनातून विशाल जीवनात नेऊन सोडतं ते कॉलेज जीवन ! मनाच्या कंगोऱ्यांना घासून पुसून उदात्ततेचा आकार देतं ते कॉलेज जीवन ! खऱ्या अर्थानं स्वतंत्र शिक्षण घेण्याचं शिक्षण देतं ते कॉलेज जीवन ! ग्रंथालयाचा मनसोक्त उपयोग करून देऊन विचारांचं भांडार मुक्त हस्ताने लुटायला लावतं ते कॉलेज जीवन ! श्रेष्ठ लोकांच्या सहवासात व्यक्तिमत्त्वाची विशिष्ट ध्येयानं जडण घडण करतं ते कॉलेज जीवन ! उत्तुंग विचारांनी आणि भावनांनी भविष्यकाळाची स्वप्नं सतत डोळ्यासमोर तरळत ठेवतं ते कॉलेज जीवन ! व्यक्तीची सर्वांगिण उन्नती करून समाजनिष्ठेचे आणि राष्ट्रनिष्ठेचे ध्येय फुलवितं ते कॉलेज जीवन ! !"

विठ्ठलरावांचे कॉलेज जीवन हे असे होते.

दिवसामागून दिवस जात होते. वर्ष संपत आलं. परीक्षेचे वेध

लागले. त्या वेळी सर्व परीक्षा विद्यापीठाच्या असत. परीक्षा म्हटलं की फॉर्म फी आलीच. प्रिव्हीयसची फॉर्म फी वीस रुपये होती फक्त दहा रुपये स्कॉलरशिपच ज्याला मिळू शकते, ज्याचे दरमहाचे उत्पन्न तेवढंच होते. त्याने वीस रुपये कोठून आणायचे ? स्वस्ताईच्या काळात वीस रुपये देणार तरी कोण ? पुन्हा संकट !

> जो संकटांना सामोरा जायला तयार असतो, त्याच्या
> निष्ठा पुरविण्यात संकटांनाही आनंद वाटत असावा।

आता या संकटाला सामोरे तरी कसे जायचे ? माघार घ्यायची नाही हे तर निश्चित ठरलं आहे, पण रस्ता तरी कसा शोधायचा ?

विठ्ठलराव घरात विचार करीत बसले होते. तोच नेहमी येणारे नरहरपंत नावाचे एक ब्राह्मण गृहस्थ त्यांच्या खोलीत आले. सतत येण्याजाण्याने नरहरपंत त्यांच्या चांगल्याच ओळखीचे बनले होते. एक मराठ्याचा मुलगा एवढे काबाडकष्ट करून शिकतो आहे याचं त्यांना मनापासून कौतुक वाटत असे. चांगल्या गोष्टी कोणी करीत असेल तर मग त्या कोणत्याही जातीत असोत, धर्मात असोत, आपल्याला त्याच्याबद्दल आनंद वाटला पाहिजे. कौतुक वाटलं पाहिजे. नरहरपंत विठ्ठलरावांचे खरे मित्र बनले होते. विठ्ठलरावांच्या आनंदाने त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद खुलत असे आणि त्यांच्यावरच्या संकटाने, दु:खाने नरहरपंतांच्या डोळ्यांत अश्रू तरळत असत. विठ्ठलरावांची सारी हकीगत त्यांना कळली. थोडासा विचार करताच त्यांना मार्ग सापडला. ते म्हणाले–

" विठू ! रा. ब. नवलकर माझ्या ओळखीचे आहेत. त्यांची आपण भेट घेऊ. ते तुला जरूर मदत करतील. "

" म्हणजे पैशाकरिता हात पसरायचे ? भीक मागायची ? "

" अरे विद्येसारख्या पवित्र कामाकरिता भीक मागण्यास काहीच हरकत नाही. आमची ब्राह्मणांची मुले नाही का मधुकरी मागून शिकत.

विद्यार्थ्याने विद्यार्जनाकरिता कोणतेही काम करायची.
प्रसंगी भीक मागायची वेळ आली तरी लाज धरू नये.

चल मी येतो तुझ्यावरोबर. "

विठूचे मन त्यांनी कसे तरी वळविले आणि रा. ब. नवलकरांची भेट घेऊन त्यांना सारी हकीगत सांगितली. त्यांनी दोन रुपयांची मदत व एक चिठ्ठी लिहून दिली. आपल्या काही मित्रांची नावे सांगितली. विठ्ठलराव व नरहरपंत हे दोघे पैशाकरिता उन्हातान्हात भटकत होते. रुपया रुपयाने त्यात भर पडत होती आणि एकाएका दिवसाने पैसे भरण्याची मुदत कमी होत होती. चार दिवस राहिले. आठ रुपये जमले. दोन दिवस राहिले. बारा रुपये जमले. चौदा रुपये झाले. फक्त सहा रुपये पाहिजे होते. फक्त सहा रुपये ! दिवस राहिला होता फक्त एक ! उद्या पैसे भरायचे. सहा रुपये जमणार कसे ?

नरहरपंतांनी सांगितलं—

" तुझ्याजवळ रा. ब. नवलकरांची चिठ्ठी आहेच. तू डॉ. शेळक्यांचेकडे जा. ते मराठा समाजातले प्रख्यात डॉक्टर आहेत. श्रीमंत आहेत. त्यांच्याच जातीचा एक मुलगा एवढ्या संकटांना तोंड देऊन शिकतो आहे हे पाहिल्यावर त्यांना कौतुक वाटेल आणि मला वाटतं तुझी राहिलेली सगळी रक्कम पूर्ण होईल."

विठ्ठलरावांनी अखेरचा प्रयत्न म्हणून त्यांचं म्हणणं ऐकलं. ते डॉ. शेळक्यांचेकडे गेले. रा. ब. नवलकरांची चिठ्ठी त्यांना दाखविली. डॉ. शेळक्यांचेकडून कौतुक तर बाजूलाच राहिले, मदत तर मिळाली नाहीच. मिळाला वाक्‌बाणांचा असह्य तडाखा ! हृदयाचे शतशः तुकडे करणारा ! ध्येयाला भुईसपाट करणारा ! पुढच्या आशा

आकांक्षांना छिन्न विछिन्न करणारा ! "पैसे नसतील तर शिकावे कशाला ? गुरे वळावीत." अजून ते शब्द कानात घुमत होते.

हे सारे प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोरून चित्रपटासारखे सरकून गेले. मग त्यांचं मन त्यांना म्हणालं–

"त्या वेळी मार दिमाखात आईला सांगितलं होतंसना की, "मी काय वाटेल ते कष्ट करीन, पण माझं ध्येय पूर्ण करीन. ध्रुव, एकलव्य, शिवाजीमहाराज हे माझे आदर्श आहेत. ते ध्येयनिष्ठ जीवन जगले आहेत. संकटांना तोंड देऊन ते यशस्वी झाले आहेत." मग आता एवढ्याशा संकटाने डगमगलास ? ध्रुव ताऱ्यासारखा अढळ राहण्याचा निश्चय केलास आणि एका फुंकाऱ्याने ढळलास ? आपली कुवत नव्हती तर एवढं तत्त्वज्ञान आईला सांगितलंस तरी कशाला ? आता जर जमखिंडीला परत गेलास तर आई काय म्हणेल ? आई तुझं स्वागत करील काय ? आपला मुलगा संकटांना घाबरून परत आला आहे, हे कळल्यावर तिला दुःख होईल. "यशस्वी होऊनच ये." हे तिचे शब्द तू पुरे केले नाहीस. या साऱ्या गोष्टींचा नीट विचार कर आणि काय करायचं ते ठरव !"

**मनाच्या दु:खावर काळासारखं दुसरं औषध नसतं.**

ढग विरू लागावेत, आकाश निरभ्र व्हावं. तसे निराशेचे ढग विरून जाऊन मन स्वच्छ होऊ लागलं. भावनावेग कमी होऊ लागला. त्याची जागा विचाराने घेतली.

**भावनेच्या प्रबल ओघात विचार बुडून जातात, पण तो ओघ मंदावला की लव्हाळ्याप्रमाणं डोकं वर काढून ते आपला प्रभाव मनावर गाजवू लागतात.**

विठ्ठलरावांचा ढळलेला तोल पुन्हा सावरला. चुकलेला ताल परत जुळला. नव्या निश्चयाने ते नवा मार्ग शोधणार तोच दार खटखटले.

त्यांनी आनंदानेच दार उघडले. पाहतात तो त्यांचा बालमित्र विष्णुपंत देशपांडे ! त्यांना आश्चर्यच वाटले. त्यांनी त्याला आत बसायला सांगितले. बोलायला सुरुवात करण्यापूर्वीच त्याने वीस रुपये काढले आणि विठ्ठलरावांचे समोर ठेवून तो म्हणाला–

" विठू ! तुझी अडचण तुझ्या वहिनीला, नव्हे तुझ्या वहिणीला समजली आणि तिला मिळालेली भाऊबीज घेऊन तिनं मला तुझ्याकडे धाडलं. हे वीस रुपये घे आणि तुझी परीक्षेची फी भर. "

विठ्ठलरावांचे डोळे एकदम पाणावले. अश्रू वाहू लागले. जगात ज्याला कोणी नाही त्याच रक्षण करणारा परमेश्वर असतो, हे त्यांना मनोमनी पटलं. डॉ. शेळके आणि विष्णु देशपांडे ! दोन व्यक्ती त्यांच्या डोळ्यापुढे पटकन् उभ्या राहिल्या. एक त्यांच्या जातीचा असून त्यांच्या ध्येयावर निखारे ठेवणारा आणि दुसरा दुसऱ्या जातीतला असून त्यांच्या उरापोटी वाळगलेल्या ध्येयाला खतपाणी घालून फुलविणारा ! सहज त्यांच्या मनांत आलं,

**" मनाचा चांगुलपणा, थोरपणा हा जातीवर अवलंबून नसतो. तो मनाच्या घडणीवर, सुसंस्कारावर अवलंबून असतो. संस्कारक्षम मनं विशिष्ट जातीतच जन्माला यतात असं नाही. "**

विठ्ठलरावांच्या मुखातून शब्द उमटेनात तरीहो ते म्हणाले–

" विष्णू ! दिव्यातलं तेल संपताना एखाद्यानं अकस्मात् त्यात तेल घालावं, तसं तू केलं आहेस. मी पैसे जमत नव्हते म्हणून किती निराश झालो होतो, पण आता माझी काळजी निवारण झाली. किती चांगले लोक आहात रे तुम्ही ! जन्मभर तुमची सेवा केली तरी उपकार फिटायचे नाहीत. एवढंच काय पण माझ्या कातडीचे जोडे शिवून तुम्हांला घातले तरी ऋण फिटायचे नाही बघ ! "

" विठू, काय बोलतोस हे. "

विठ्ठलरावांनी पैशाचा स्वीकार केला. परीक्षा झाली. रिझल्ट लागला. यशश्रीने त्यांना माळ घातली. एवढ्या कटकटीने त्यांच्या हातात पहिले वर्ष पडले.

पुढच्या वर्षाकरिता विठ्ठलराव पुण्याला आले. आर्थिक अडचण सहन करायची कशीतरी सवय लावून घेतली होती, त्यामुळे सुरवातीचे काही दिवस ठीक गेले. तसेच सारे दिवस गेले असते तर त्यांची कसोटी कशी लागली असती असती ? टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण नसते का आले ? मुशीत घातल्याशिवाय सोने उजळून निघाले नसते का ? तसं व्हायचं नव्हतं.

जीवनाला प्रवाह, पण बांध लागला तर जीवनातली मजाच संपते
संकटांशी [illegible] असल्याशिवाय जीवन रुचकर होत नाही

विठ्ठलरावांची बहिण जनाक्का हिचा सासरी अतोनात छळ होत होता. ती शिकलेली होती हाच तिचा दोष ! तिचा नवरा आणि सासू दोघंही तिला गुरासारखं मारीत असत. हे जेव्हा त्यांना समजलं तेव्हा त्यांना अन्नपाणी गोड लागेना. तिला त्या जाचातून सोडविणे भाग होते. पण घरी तरी कशी आणणार ? जमखिंडीला वडिलांना नोकरी नाही आणि पुण्याला तर स्वतःचेच खाण्यापिण्याचे हाल ! अशा स्थितीतही त्यांनी तिला पुण्याला आणलं. शाळेत शिक्षण देण्याचं मनाशी ठरवून त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केला. योगायोगाने मिस् मेरी भोर यांच्या मदतीनं हुजुरपागेत तिला प्रवेश मिळाला. त्याचबरोबर मराठा मुलींच्याकरिता असणारी दरमहा दहा रुपयाची स्कॉलरशिपही तिला मिळाली. तिचा प्रश्न सुटला. आर्थिक अडचण थोडी दूर झाली. क्षणभर आलेलं वादळ शमलं. प्रवाह पूर्ववत् शांतपणे वाहू लागला.

मग विठ्ठलरावांनी आई आणि पत्नी यांनाही पुण्याला आणलं. पैशाची नेहमीची रड होतीच म्हणून शिकवण्या करायला सुरवात केली. त्याचवेळी त्यांना वाटले की, बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे उदार आणि विद्येचे उपासक आहेत. आपण त्यांच्याकडे गेलो तर निश्चित थोडीफार मदत मिळेल. ते मग बडोद्याला गेले. श्रीमंतांची भेट घेतली. त्यांनी पंचवीस रुपये महिना स्कॉलरशिप मंजूर केली. पण ती मिळताच ' डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी 'ची स्कॉलरशिप बंद झाली. पूर्वीपेक्षा घर बरे चालायला लागले. मानसिक ताण थोडासा कमी झाला.

अशा स्थितीत दोन वर्षे निघून गेली. बी. ए.चे शेवटचे वर्ष उजाडलं. इतिहास आणि कायदा हे आवडीचे विषय त्यांनी घेतले. कायद्यावरची व्याख्याने डेक्कन कॉलेजात होत असत. पैशा अभावी ते कॉलेजला पायीच जात होते. संगमातून होडीने जर गेले तर कॉलेज जवळ पडत होते. विद्येकरिता ह्या विद्येच्या उपासकाने हा सारा त्रास सहन सहन केला.

एके दिवशी व्याख्यान संपवून येताना खूप उशीर झाला. रात्र पडली. होडी बंद झाली. आता परत कसं जायचं ? विठ्ठलरावांनी क्षणभर विचार केला. कपडे काढले. पुस्तके त्यात बांधून ते डोक्याला बांधले आणि पोहत पैल तीराला ते आले.

दिवस असे चालले होते. जात होते. कॉलेजचा अभ्यास संपला. घरच्या अभ्यासाचा जोर वाढला. रात्रीचे दिवस होऊ लागले. परीक्षा जवळ आली. अगदी जवळ आली आणि एके दिवशी विठ्ठल-रावांची परीक्षा संपली. पेपर्स चांगले गेले. आता लक्ष लागले होते रिझल्टकडे ! तपश्चर्येच्या फळाकडे ! यज्ञाच्या सांगतेकडे ! मुंगीच्या पावलाने तो दिवस जवळ येत होता. उत्सुकता शिगेला पोहचली

होती. हुरहूर, आतुरता, अपेक्षा अनेक संमिश्र भावनांचे तरंग मनात उठत होते.

रिझल्ट लागला. विठ्ठलरावांना कायदा या विषयात फर्स्ट क्लासचे मार्कस् मिळाले होते. त्यामुळे ते फर्स्ट एल्.एल्. बी.ची परीक्षाही पास झाले होते. आनंद गगनात मावत नव्हता. उच्च ध्येयाची ती गोड सांगता होती. हे सगळे घडत होते तोच विष्णु देशपांडे तेथे आला. त्याने विठ्ठलरावांना आनंदाने मिठी मारली. तो म्हणाला,

" शाब्बास विठू ! अखेर तू जिंकलीस. अनेक संकटांना तोंड देऊन तू यशस्वी झालास. आपलं ध्येय तू पूर्ण केलंस. "

आनंदाश्रूंनी विठ्ठलरावांचे डोळे भरून आले. ते म्हणाले,

" विष्णु ! इमारतीचा पाया तू पक्का केलास म्हणून इमारत पूर्ण होऊ शकली. "

" मी काय केलं ? सारी परमेश्वराची कृपा. सारं तोच करीत असतो. ध्येयनिष्ठांची तो कसोटी पहात असतो आणि यशस्वी झाल्यावर अंतिम यशही तोच देत असतो. "

विष्णूने त्यांच्या हातावर पेढा ठेवला आणि त्यांचा निरोप घेतला. विठ्ठलराव त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तसेच बघत राहिले होते. त्याला थांबवून घेण्याचंही भान त्यांना राहिलं नव्हतं.





जीवनध्येय प्राप्ती करिता।
तरतो ही जणू संकट सरिता।।



करण्या प्राप्ती नवध्येयाची ।
अशी भूमिका पटा मागची ।।




# ध्येयनिष्ठेची तळमळ

"बेन, लक्ष्मी आर्ट गेला तर गेला. काय हरकत नाय. तुमी काळजी करू नका. फाळकेशेट मनावर घेईल तर उद्याच्या उद्या दुसरा आर्ट प्रेस आम्ही त्यांच्या पुढं उभा करू. फक्त त्यांनी हो म्हणायचा अवकाश."

"खरं आहे ते. पण 'इकडून' हो म्हणायचं झालं पाहिजे ना ! पाहीन बापडी प्रयत्न करून."

व्यापाऱ्याला उत्तर देऊन सरस्वतीबाई घरात आल्या. आपल्या पतीराजांचा स्वभाव त्यांना माहीत होता. तरीही त्यांच्या सध्याच्या वागण्याचा अर्थ त्यांच्या लक्षात येत नव्हता. घरात जाता जाताच त्यांच्या मनात असंख्य तरंग उठले. त्या मनाशीच विचार करीत होत्या.

एवढी मोठी संधी आता यांना आणखी कोणती मिळणार आहे, कोणास ठाऊक ? अनेक व्यापारी सारखे बग्गी घेऊन यांना विचारायला

येत आहेत. पैसे देऊन आर्ट प्रेस काढून द्यायला तयार आहेत, पण यांचं आपलं एकच उत्तर, 'मी आता त्या धंद्यात पडणार नाही.' एवढा मान आणि पैसा मिळणार तरी कुठं ? यांच्या मनात काही तरी निराळंच असतं. काही विचारायला गेलं की म्हणतात, 'तुला त्यातलं काही कळायचं नाही. पुरुषानं जीवनात काही तरी महान ध्येय ठेवलं पाहिजे.'

**जीवनात काही साधायचं असेल तर ध्यास आणि अभ्यास हे दोन शब्द प्रत्येकाने डोळ्यासमोर ठेवले पाहिजेत.**

'लोकांच्या मिनतवारीनं जगण्यापेक्षा मी आता नवा व्यवसाय शोधणार आहे.' मला त्यातलं काही कळत नसेल पण घर चालवायला पैसे लागतात हे तर मला कळतं ना ? घरात पैसे द्यायचे नाहीत, कुठला तरी ध्यास घ्यायचा आणि बसायचं तासन् तास विचार करीत. अशानं का संसार होतो ?

याच विचारात त्यांनी देवापाशी दिवा लावला. देवाला हळदी कुंकू वाहिलं. नमस्कार केला. रात्रीचा स्वयंपाक तयार केला. रात्री बऱ्याच उशीराने दादासाहेब बाहेरून फिरून आले. आपल्याच तंद्रीत त्यांनी जेवायला सुरवात केली. थोडा वेळ असाच गेला. मग सरस्वतीबाई त्यांना म्हणाल्या–

"ऐकलं का, आज एक व्यापारी येऊन गेले. नाव काय बाई म्हणाले ते ?... काही लक्षात येत नाही..."

"हं."

"आपण हो म्हणालात तर दुसरा छापखाना काढून द्यायला तयार आहेत ते."

"आणखी काय म्हणतात ... ? "

" काही नाही, आपण फक्त 'हो' म्हणावं अशी त्यांची इच्छा आहे."

" हं . . . मग . . . दादासाहेब आपल्याच विचारात बोलत होते.

" मग काय, म्हणणारना हो ? नाही तरी सध्या कुठे काम नाही. दुसरा व्यवसाय नाही. ते जर खर्च करीत असतील तर आपण 'हो' म्हणावं. घरचा खर्च तरी चांगला चालेल. आज किती ओढाताण होते आहे ? "

" आणखी काय सल्ला आहे ? "

" सल्ला काय असायचा आहे ? आपण 'हो' म्हणावं."

" आणि त्यांचं मिंधं व्हावं. असंच ना ? "

" मिंधें होण्याचा प्रश्न तरी येतो का ? उगीच डोक्यात काही-तरी घ्यायचं आणि बसायचं. ते जर सर्व पैसा खर्च करीत आहेत तर आपलं काय विघडलं ? या व्यवसायात आपण नाव मिळविलं आहे. आता नव्यानं तोच व्यवसाय केला तर पुन्हा कीर्ती मिळेल, पैसा मिळेल. संसार सुखाचा होईल."

" हं . . . एकंदरीत तुम्हांला आमच्या मनाची कल्पना यायची नाही.

**एक स्वतंत्र, उच्च ध्येय उराशी कवटाळून त्याकरिता तळमळणाऱ्या माणसाचं मन संसारात रमत नसतं. संसारच करीत बसावं असं त्याला वाटतच नाही.**

संसाराच्या साखळ्यांच्या मंजुळ आवाजात आमच्या मनाला संतोष वाटत नाही."

" असं काहीतरी बोललं म्हणजे झालं. संसारात मन रमत नव्हतं तर लग्न केलंत कशाला ? दोन वेळेला जेवायला लागतं ते पैशा-शिवाय का मिळणार आहे ? आज आपण पैसा देत नाही. किती दिवस चालायचं असं ? तेव्हा . . . "

*

" सरस्वती, काय वाटेल ते झालं तरी आता मी छापखान्याचा धंदा परत करणार नाही. कोणत्याही प्रलोभनाला मला वळी पडायचं नाही. मी लवकरच एखादा नवीन व्यवसाय सुरू करीन."

" मोठमोठ्या लोकांनी देऊ केलेल्या लक्ष्मीला लाथाडून आपण नवा धंदा तरी कोणता शोधणार अहात देव जाणे ! "

सरस्वतीबाईंनी हातातील भांड्यावर आपला राग काढला.त्याची जाणीव दादासाहेबांना झाली. ते काही बोलले नाहीत. जेवण आटोपून ते आपल्या खोलीत गेले. अस्वस्थपणे ते फेऱ्या मारीत होते. आपल्या पत्नीचे शब्द त्यांना आठवत होते. त्याचाच विचार ते करीत होते.

" येणाऱ्या लक्ष्मीला लाथाडून मी असा कोणता व्यवसाय सुरू करणार आहे की ज्यात मला पैसा आणि कीर्ती मिळेल ? मघाशी मला उत्तर देता आलं नाही, पण आता तरी माझ्यापाशी उत्तर कोठे आहे ? माझं ध्येय काहीतरी स्वतंत्र व्यवसाय निर्माण करण्याचं आहे. पण कोणता व्यवसाय ?"

बऱ्याच उशीरापर्यंत ते आपल्या खोलीत फेऱ्या मारीत होते. तरीही उत्तर सापडत नव्हतं. मन उद्विग्न बनलं होतं. नवा व्यवसाय ! कीर्ती आणि पैसा देणारा ! विचार चालू असतानाच कधीतरी पहाटेच्या सुमारास त्यांचा डोळा लागला.

सकाळी जेव्हा ते जागे झाले तेव्हाही नव्या व्यवसायाचे विचार त्यांच्या मनातून जात नव्हते. दिवस विचारातच जात होता. दुपारचे पाच वाजले आणि त्यांना आपल्या नेहमीच्या फिरण्याच्या कार्यक्रमाची आठवण झाली. त्यांचा प्रत्येक दिवस जरी बेचैन अवस्थेत जात होता, तरी त्यांनी फिरायला जाण्याचं व्रत सोडलं नव्हतं. प्रेसची भागीदारी संपल्यापासून तेवढाच एक विरंगुळा त्यांना होता. त्यातच विचारांची तीव्रता कमी करण्याचं सामर्थ्य होतं. उद्विग्न मनाला दिलासा देण्याची

शक्ती होती. भोवतालची विविध दृश्ये ती किमया करू शकत होती; म्हणूनच त्यांचा हा कार्यक्रम चालू होता.

आजही नेहमीप्रमाणे ते निघाले. खिशात चार आणे टाकले. चपला घातल्या आणि घराच्या बाहेर पडले. वराच वेळ मनाच्या अस्वस्थ अवस्थेत ते भटकत होते. भोवतालची गर्दी, जाणारे येणारे युरोपिअन व इतर लोक यांची त्यांना जाणीव नव्हती. मोटारचे वाजणारे भोंगे त्यांचं चि त्त वेधू शकत नव्हते. ते आपल्याच विचारात चालले होते. अजून मार्ग दिसत नव्हता. रस्ता सापडत नव्हता. नव्याची नवलाई पहाण्याची इच्छा असूनही, त्याची तळमळ असूनही ते ध्येय मात्र अजून अमूर्त होते. त्याला आकार दिला गेला नव्हता. शब्द तयार होते. कल्पना समोर होत्या. कष्ट जवळ होते, पण वेळ आली नव्हती. येत होती, पण त्याची जाणीव झाली नव्हती.

रात्र पडू लागली. मुंबईच्या दिव्यांनी रात्रीला उजळले. दादासाहेब अजूनही फिरत होते. फिरता फिरता गिरगावामधल्या अशा जागेवर आले की जेथे इंग्रजी वाद्यांचे स्वर स्वच्छ ऐकू येत होते. स्वरांच्या आवाजाच्या दिशेने आधी कान गेले आणि नंतर डोळे गेले. समोरच्या बाजूला एक तंबूवजा थिएटर होते. ते तसेच पुढे गेले. “अमेरिका इंडिया” नावाचे थिएटर होते ते. येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील चित्रपट होता. त्यांना काय वाटलं कोण जाणे, त्यांनी खिशात हात घातला. चार आण्यांचे तिकिट काढले आणि तंबूत जाऊन बसले.

अर्धा तास ते मूकपट पाहात होते. तो संपल्यावर ते बाहेर आले. तो मूकपट पाहिल्यानंतर त्यांच्या मनःस्थितीत जमीन अस्मानाचे अंतर पडले. जाताना चेहरा उद्विग्न होता. खिन्न होता. उदास होता. पुढं काय करावं याची विवंचना चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती.

आता वरील कोणतेही भाव तेथे नव्हते. त्याची जागा आनंद व आत्मविश्वास यांनी घेतली होती.

येशूच्या त्या मूकपटाने त्यांच्या मनावर खोल ठसा उमटविला होता. एका महान् विभूतीचे जीवन प्रत्यक्षासारखे पडद्यावर दिसू शकते, याची त्यांना प्रथमच जाणीव झाली होती. लोकमानसावर त्याचा विलक्षण परिणाम होतो, याचीही त्यांना प्रथमच कल्पना आली होती. विचार करिताकरिताच त्यांना वाटलं " मीही असाच मूकपट काढू शकलो तर ?" दुसऱ्याच क्षणी त्यांच्या मनाने निश्चय केला हाच नवा व्यवसाय !

हरपलेले श्रेय सापडल्याच्या आनंदात त्यांची पावले घराच्या दिशेने वेगात पडत होती. तरीही जाताना त्यांच्या डोळ्यासमोर नाचत होते मघाचे येशू ख्रिस्ताचे जीवन ! चित्रपटात जसं एक चित्र सरकून त्याच्या जागी दुसरं चित्र येतं, त्याप्रमाणे त्यांच्या मनाच्या पडद्यावरचे येशूचे चित्र सरकले आणि त्या जागी त्यांना राम दिसू लागला. हळुहळू सारे रामायण, महाभारत यातील प्रसंग त्यांच्या पुढून सरकू लागले. ते सारे प्रसंग त्यांना सांगू लागले–" ऊठ ! याच क्षणाची आम्ही वाट पाहात होतो. तो क्षण अगदी जवळ आला आहे. तुला नवा व्यवसाय पाहिजे ना ? मग हा व्यवसाय नवीन आहे. कोणीही हाताळला नाही. भारतात पहिलं चित्र निर्माण करण्याचा मान तुला मिळेल. तेच ध्येय तू पुढे ठेव आणि लाग कार्याला."

काहीतरी नवीन सापडल्याच्या आनंदातच त्यांनी घरात पाऊल ठेविले. सावित्रीबाईंना ते सारे नवीन वाटले, पण विचारण्याचे धाडस मात्र झाले नाही. जेवतानासुद्धा त्यांचं लक्ष नव्हतं. कसला तरी विचार करीत त्यांनी कसंवसं जेवण संपविलं. आपल्या खोलीत ते आले. काही पुस्तकं त्यांनी चाळली. त्यांचं समाधान होईना. पुन्हा

ते अस्वस्थ झाले. मूकपट कसा तयार करायचा ह्यावर त्यांची विचार-चक्रं जोरानं फिरू लागली. रात्रभर ते खोलीत फेऱ्या मारीत होते. मधूनच पुस्तकाची पाने फडफडत होती. ध्येय ठरलं होतं, पण ते सिद्धीस कसं न्यायचं याचा मार्ग ठरला नव्हता.

सकाळी दूध घेण्याकरता ते आत आले. ते पाहताच सरस्वतीबाई त्यांना म्हणाल्या–

" रात्री झोपला नव्हता वाटतं ? "

" हं ! कशावरून ? "

" नाही, रात्रभर दिवा जळत होता म्हणून विचारलं. "

" नव्या व्यवसायाचा विचार करीत होतो. "

" मग, सापडला का ? का नुसताच विचार, नेहमीप्रमाणं ! " सरस्वतीबाईंनी हसत विचारलं.

" आता नुसता विचार नाही. बरं, पण ते जाऊ दे. आज संध्याकाळी आपल्याला सिनेमाला जायचे आहे. संध्याकाळी तयार रहा. "

त्यांच्या या बोलण्याचे त्यांना आश्चर्य वाटले.तरी त्यांनी विचारलं.

" पण नवा व्यवसाय कोणता ते तर सांगाल की नाही ? "

" कळेल थोडेच दिवसात . . . "

दादासाहेबांचा दिवस विचारातच गेला. सायंकाळचे पाच वाजले. ठरल्याप्रमाणे दोघे सिनेमाला निघाले. सिनेमाचं नाव होतं "अमेरिका इंडिया सिनेमाटोग्राफ ! " थिएटरजवळ जाताच बँडचे आवाज ऐकू येऊ लागले. दादासाहेबांनी आठ-आठ आण्यांची पहिल्या वर्गाची तिकिटे काढली. गर्दी खूपच होती. दादासाहेब पत्नीसह त्या गर्दीत मिसळले आणि आपल्या जागेवर जाऊन बसले. थोड्या वेळाने चित्रपट सुरू झाला. दादासाहेबांनी त्याचं बारकाईनं निरीक्षण चालवलं होतं.

सिनेमा संपला. दोघे बाहेर आले. सरस्वतीबाईंनी विचारलं–

" एवढं बारकाईनं काय पाहात होता ? आपण दोघांनी बरेच चित्रपट पाहिले असतील, पण आजच्या एवढं निरखून पाहाताना मी कधीच पाहिलं नाही आपल्याला. "

" चित्रांचे बारकावे बघत होतो. ती हलतात कशी ? फोटोग्राफी कशी केली आहे ते बघत होतो. "

" खरंच, ही चित्र कशी हालतात हो ? अगदी खरं दृश्य बघत आहोत असा भास होतो. "

दादासाहेबांनी जास्त चर्चा न करिता त्यांना प्रोजेक्शन रूमजवळ नेले आणि आतले यंत्र दाखवीत ते म्हणाले –

" ते पाहिलंस का यंत्र ! त्याच्यामुळे ही चित्रे आपोआप हलताना दिसतात. बाकी, आत्ता नाही कळलं तरी चालेल. पुढे कळेल आपोआप. "

" म्हणजे... ?

" म्हणजे असं की, हाच नवा व्यवसाय आपण करणार आहोत. "

" खरंच ? "

" आहे की नाही नवा धंदा ! आता त्याकरिता कष्ट खूप करावे लागतील. पण,

> ध्येय डोळ्यासमोर ठेविले, की ध्येयनिष्ठ माणूस त्याकरिता तळमळीने काम करतो. त्याच्या त्या प्रयत्नातच त्याला आनंद वाटत असतो. "

बोलता बोलता दोघे घरी आले.

दुसऱ्या दिवशी सकाळी दादासाहेब उठले. कालच्या टॉकीजजवळ ते गेले. प्रोजेक्शन रूमचे जवळपास वेड्यासारखे भटकू लागले.

एवढा मोठा माणूस ऑपरेटरच्या दृष्टीने निरुपयोगी फिल्मस् जमा करू लागला. भिकारी किंवा वेडे रस्त्यावरचे कागद जमा करतातना तसं! त्यांना अशा स्थितीत पाहिल्यावर यांना वेड तर लागलं नाहीना, असं कित्येकांना वाटलं.

वरेच फिल्मस्चे तुकडे गोळा करून त्यांनी घरी आणले. एक मॅग्नीफाईंग ग्लास आणला. दुपारच्या जेवणानंतर त्यांनी त्या फिल्मचे बारकाईने निरीक्षण करायला सुरवात केली. बराच वेळ हा कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी कोट, पगडी अडकविली आणि थिएटरचा रस्ता धरला.

सुमारे दोन महिने दादासाहेव रोज मूकपट पाहात होते. त्याचा त्यांना ध्यास लागला होता. आज मजेने चित्रपट पाहाणारे अनेक वीर भेटतील. त्या काळातही ते असतील, पण "मला चित्रपट तयार करायचा आहे. त्यातून रामकृष्णांचे आदर्श जगाला सांगायचे आहेत." हे ध्येय ठेवून त्याकरिता रोज चित्रपट पाहाणारा माणूस हा एकच !

दादासाहेबांना चित्रपट काढण्याचा नुसता ध्यासच लागला नव्हता तर त्याचबरोबर त्यांनी त्याचा अभ्यास सुरू केला होता. एके दिवशी त्यांनी टॉय सिनेमा विकत घेतला. फिल्मच्या माळाही विकत आणल्या. मेणबत्तीनं लेन्सवर प्रकाश टाकून रात्रीच्या वेळी त्यांचे सिनेमाचे खेळ सुरू झाले. त्यातूनच ते भावी काळात तयार होणाऱ्या मूकपटाच्या कल्पना रंगवीत होते.

> ध्येयनिष्ठ माणसं कल्पनेतच कल्पना रंगवत न बसता
> त्या प्रत्यक्षात उतरविण्याचा खटाटोप ते करतात.

मूकपट तयार करण्यासंबंधी आवश्यक ती माहिती मिळविण्याच्या प्रयत्नाला ते लागले. या विषयावर कोठे पुस्तके मिळतात का ते पाहावे, याकरिता एके दिवशी त्यांनी फोर्ट विभागातील सारी दुकाने

धुंडाळली, पण उपयोग झाला नाही. त्यांना एका दुकानात एवढेच कळले की, पुढील आठवड्यात एक पुस्तक येणार आहे. चातकासारखे ते वाट पहात राहिले. शेवटी पुस्तक हातात पडले. पुस्तकाचे नाव होते. " ए. बी. सी. गाईड टू सिनेमाटोग्राफी ! " मोठ्या आशेने त्यांनी पुस्तक उघडले आणि तेवढ्याच निराशेने त्यांनी ते खाली ठेऊन दिले. अगदी सामान्य माहिती त्या पुस्तकात होती. फायदा एकच झाला आणि तो म्हणजे जाहिरातीच्या सहाय्याने कॅटलॉग आणि मशिनरी हे साहित्य इंग्लंडहून मागविता आले.

सामुग्री येताच त्यांच्या कामाला वेगाने सुरुवात झाली. पुस्तके वाचणे, प्रयोग करणे यात त्यांचे तासन् तास जाऊ लागले. पुन्हा सायंकाळी तीन चार तास सिनेमा पाहाण्याचा कार्यक्रम असेच. हे सगळं करताना जेवणाची आबाळ होऊ लागली रात्र रात्र झोप मिळेनाशी झाली. असं एकदोन दिवसच नाही तर सतत दीड दोन महिने चाललं होतं. ध्यास एकच होता सिनेमा तयार करणे ! ध्येय ठरलं होतं. ते पूर्ण करण्याची तळमळ होती. जिद्द होती. म्हणूनच त्यांच्या जीवनाला एक प्रकारची शिस्त लागली होती.

**ध्येय डोळ्यासमोर असले की जीवनात शिस्त आपोआपच येते.**

या साऱ्या गोष्टींचा परिणाम शरीरावर होत होता. त्याची जाणीव त्यांना नव्हती एवढंच ! डोळ्यांना भयंकर ताण पडत होता. त्यातून व्हायचं तेच झालं. दृष्टी अगदी मंद झाली. अंधुक दिसायला लागलं. तरीही दादासाहेबांचं काम थांबलं नाही ते चालूच होते.

रात्रीची वेळ होती. आपल्या खोलीत ते फिलमवर प्रयोग करीत बसले होते. विजेचा मोठा दिवा खोलीला उजळत होता. त्या तेजस्वी प्रकाशातसुद्धा त्यांना अगदी अंधुक दिसत होतं. प्रयोग चालू होता.

तास झाला, दोन तास संपले. प्रकाश आणखी कमी होऊ लागला आणि आणखी काही वेळातच दादासाहेबांना काहीच दिसेनासे झाले. ज्या खोलीत विजेच्या दिव्याने अंधाराला उजळले होते, त्याच खोलीत, त्याच दिव्याच्या प्रकाशात दादासाहेबांच्या डोळ्याचा प्रकाश हरपला होता. डोळ्यापुढे अंधार होता. ध्येयाला अंधाराने आपल्या काळ्या हातांनी घट्ट पकडून ठेवले होते, त्या शांततेत त्याचे हास्य दादासाहेबांना ऐकायला येत होते. त्याच्या शब्दांचा भास होत होता. " बोल ! आता तरी तुझे प्रयोग बंद होतील ना ? असेल हिम्मत तर दाखव आता नवा व्यवसाय करून. "

काय करावं हे त्यांना सुचेना. घरातला कर्ता पुरुष अंधळा बनला. साऱ्या घराचाच प्रकाश अंतर्धान पावला. सगळीकडेच अंधाराचं साम्राज्य पसरलं. घरात आणि दादासाहेबांच्या मनातही ! आता ध्येय कसं गाठायचं, एवढी एकच तळमळ त्यांना लागली होती. ते देवाला एकच प्रार्थना करीत होते " देवा, एकदा मला मूकपट तयार करू दे. तो मला पाहू दे. मग जरी मला अंधळं केलंस तरी चालेल, पण एवढी एकच संधी दे. देवा, एकच संधी दे. "

अनेक डॉक्टरांचे पुष्कळ उपाय झाले. दृष्टी येईना. शेवटी डॉक्टर प्रभाकरांना त्यांचे डोळे दाखविले. ते प्रख्यात नेत्र वैद्य होते. देवाला दादासाहेबांचं गाऱ्हाणं कळलं. त्यानंही ते ऐकलं. आणि काय चमत्कार देवाच्या दयेनं म्हणा किंवा डाक्टरांच्या उपायाने म्हणा त्यांना दृष्टी आली. गेलेली दृष्टी परत मिळाली. ध्येयसिद्धीकरिता परत प्रकाश सापडला. अंधाराकडून प्रकाशाकडे त्यांची वाटचाल सुरू झाली. समोरचं विश्व जेव्हां त्यांनी पाहिलं तेव्हां त्यांना किती आनंद झाला. शब्दांनी कसा वर्णन करायचा तो ? मुक्या माणसाला अमृताच्या

गोडीचं वर्णन शब्दांनी करता येईल का? तसंच, खरोखर तसंच दादासाहेबांचं झालं.

या आनंदावरही बंधनं होती. त्यांना वाचायची अथवा डोळ्यावर ताण पडेल अशी कोणतीही कामं करायची परवानगी नव्हती. सरस्वतीबाईना वाटलं आतातरी हे चारचौघासारखे वागतील. आपला नादीष्टपणा सोडून देतील. संसार व्यवस्थित करतील. पण त्यांची आशा फोल ठरली.

ध्येयनिष्ठ लोक संकटांना घाबरून आपलं ध्येय सोडत नसतात. उलट जी जी संकटे आड येतील, ती ती त्यांची शक्ती वाढत आहे. '[illegible]' पूर्ण झाल्याशिवाय त्यांना गप्प बसवतच नाही

दादासाहेब ध्येयनिष्ठ होते. ध्येय पूर्ण करण्याची त्यांना तळमळ होती. आत्मविश्वास होता आणि जिद्दही!

आशा परिस्थितीतही ते दुसऱ्याकडून वाचून घेत होते. काही वेळा प्रयोग करीत होते. एके दिवशी प्रयोग करताना त्यांना वाटलं नुसती पुस्तके वाचून आणि प्रयोग करून माहिती मिळत असली, तरी प्रत्यक्ष इंग्लंडला जाऊन काम पाहून येणं हे जास्त चांगलं. लगेच त्यांचा निश्चय ठरला. त्यांच्या या संकल्पाला दहा हजार रुपयांची आवश्यकता होती.

ते सकाळीच उठले. लगेच त्यांनी यशवंतराव नाडकर्णी यांच्या दुकानाचा रस्ता धरला. नाडकर्णी यांचे फोटोग्राफीच्या साहित्याचे दुकान होते. दादासाहेब त्यांचे नेहमीचे गिऱ्हाईक असल्याने त्या दोघांची चांगलीच मैत्री जमली होती. ते दुकानात आले आणि त्यांनी आपली कल्पना यशवंतरावांना सांगितली. त्यांनाही ती आवडली. मग ते दोघांच्या विचाराने यशवंतरावांच्या सासऱ्यांच्या घरी आले.

त्यांचं नाव होतं आबासाहेब चिटणीस. मुंबईतील प्रसिद्ध सॉलिसिटर होते ते.

दोघंही दिवाणखान्यात आले. आबासाहेब आराम खुर्चीत पुस्तक वाचीत बसले होते. दोघांना पहाताच ते म्हणाले–

" या, बसा. काय काम काढलं आहे आज ?"

यशवंतरावांनी ओळख करून दिली.

" हे दादासाहेब फाळके. अनेक क्षेत्रात यांनी चांगली कामगिरी केली आहे. " लक्ष्मी आर्ट प्रिंटिंग वर्क्स " यांच्यामुळे भरभराटीला आले. शिवाय नाट्य-लेखन, अभिनय, फोटोग्राफी, ड्रॉईंग, पेंटिंग इत्यादि अनेक विषयात ते प्रवीण आहेत. काही कलेत त्यांना सुवर्ण पदकेही मिळाली आहेत."

एवढी ओळख करून दिल्यानंतर दादासाहेबांनी त्यांना नमस्कार केला. उलट नमस्कार करीत आबासाहेब म्हणाले–

" अलभ्य लाभ ! एका मोठ्या माणसाचं दर्शन घडलं. हं, मग काय यशवंतराव, आमच्याकडे काय काम काढलं आहे ? "

" यांची एक नवी कल्पना आहे. ते ती पूर्ण करतील असा मला त्यांच्याबद्दलचा विश्वास आहे. म्हणून आपल्याकडे मार्गदर्शनाकरिता व सहाय्याकरिता घेऊन आलो. "

" असं होय; बोला काय आहे तुमची कल्पना ? "

मग दादासाहेबांनी भारतीय चित्रपट निर्माण करण्याची संपूर्ण कल्पना सांगितली. केलेले परिश्रम सांगितले व म्हणाले–

" मला वाटतं, प्रत्यक्ष इंग्लंडला जाऊन तेथे हे काम कसं करतात हे बघून यावं. जमलं तर शिकून यावं. म्हणजे इथं येऊन लगेच कामाला सुरवात करता येईल. "

" वा, छान कल्पना आहे. अवश्य जावं. आजपर्यंत या बाबतीत कोणीच प्रयत्न केला नाही. आपण जात असाल तर मी मदत करीन. "

" म्हणूनच आपणाकडे आलो होतो. आपल्यासारख्यांचे आशीर्वाद असतील तर हा हा म्हणता काम होईल. या कामाला दहा हजार रुपये तरी लागतील. "

त्यांचा आत्मविश्वास, जिद्द पाहून आबासाहेब अवाक् झाले; पण एवढे पैसे द्यायचे कसे याबद्दल मात्र ते साशंक होते. चेहऱ्यातला हा सूक्ष्म बदल न्याहाळत दादासाहेब परत त्यांना म्हणाले–

" तारण देण्यासारखे मजजवळ काही नाही. फार तर या धाडसाबद्दल आपला भाग मी धंद्यात ठेवीन. आणि इंग्लंडलाच माझं काही बरं-वाईट झालं तर आपली रक्कम आपल्याला परत मिळावी त्याकरिता बारा हजार रुपयांच्या माझ्या विमा पॉलिसीज् मी आपल्या नावाने करून देण्यास तयार आहे. "

दादासाहेबांचे हे उत्तर ऐकून आबासाहेबांचे पूर्ण समाधान झाले. त्यांनी दहा हजार रुपयांची व्यवस्था केली. दादासाहेबांच्या ध्येयपूर्तीला हा शुभ शकून होता.

दादासाहेब लगेच इंग्लंडला गेले. " बायोस्कोप " या साप्ताहिकाच्या संपादकांची आणि त्यांची ओळख झाली. त्याचा त्यांनी चांगला उपयोग करून घेतला. संपादकाचं नाव होतं मि. केबर्न !

अत्यंत घाईत त्यांनी अनेक दुकानातून विविध प्रकारची पुस्तके घेतली. इतर सामुग्रीची माहिती घेतली. मि. केबर्न यांच्या ओळखीमुळं त्यांना एका स्टुडीओतील कामकाज प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहाता आलं. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. आपल्याला हे सहज जमेल याची त्यांना मनोमनी खात्री पटली. केवळ दहा बारा दिवसात त्यांनी या साऱ्या गोष्टी अत्यंत तळमळीने आणि धडाडीने केल्या. मग त्यांनी

विल्यम्सन् फिल्म-कॅमेरा, एक प्रिंटींग मशीन, फिल्मला भोकं पाडणारे एक परफोरेटिंग मशीन घेतले. कोडॅक कंपनीला कच्च्या फिल्मची ऑर्डर दिली. आणि दहा-बारा दिवसांच्या अल्पावधीत एवढं प्रचंड काम करून त्यांनी इंग्लंड सोडलं.

ते भारतात आले. पाठीमागून थोडे दिवसातच सर्व सामुग्री आली. आता प्रश्न होता, कथानक कोणतं निवडायचं ? सारी कामं त्यांनाच करायची होती. त्यांच्या डोळ्यासमोर एक प्रसंग आला. राजा हरिश्चंद्राचा ! राजा हरिश्चंद्र ! सत्त्वशील राजा ! स्वप्नात दिलेलं दान पूर्ण करण्याकरिता वाटेल त्या हालअपेष्टांना तोंड देणारा राजा! ध्येयवादी राजा ! आपल्या ध्येयपूर्तीची तळमळ असणारा राजा ! दादासाहेबांना कथानक सापडलं. आदर्श कथानक सापडलं. थोड्याच दिवसात पटकथा तयार झाली. कॅमेरामन् तयार होताच. रसायन-शाळा ? त्यांच्या घरात तीही तयार होती. स्वत: रसायनतज्ञ होतेच. वेळेला मालकापासून नोकरापर्यंतच्या सगळ्या भूमिका त्यांनाच पार पाडावयाच्या होत्या. सर्व साहित्य तयार झाले.

आता फक्त एकच अडचण राहिली होती.नट! ते कोठून आणायचे? सिनेमात काम करायला नट मिळविणे हे त्या काळी अत्यंत कठीण होते. शेवटी दादासाहेबांनी स्वत:च हरिश्चंद्राची भूमिका करायचा निश्चय केला. रोहिदास होताच त्यांचा मुलगा. आता राहिली तारामती ! तारामती काही केल्या मिळेना. स्त्री भूमीकेकरिता स्त्री मिळणे तर शक्यच नव्हते, पण कोणी पुरुषही ती भूमीका करायला तयार होईना. आपल्या मिशांना रजा द्यायला कोणीच राजी नव्हता. शेवटी अनेक ठिकाणी हिंडल्यानंतर साळुंके नावाचे गृहस्थ तारामतीची भूमिका करायला तयार झाले. मोठ्या मीनतवारीने ! आपण मोठे उपकार करीत आहोत अशा थाटात ! अशाच यातायातीने दुय्यम पात्रं

मिळाली. पात्र मिळवायलाच एवढा ताप झाला की सामान्य माणूस असता तर तो म्हणाला असता ‘ नको ती पात्रे आणि नको तो मूकपट. नसता खटाटोप सांगितला आहे कोणी ? बरं, पैसा पै मिळण्याची सुरवातीला शक्यता नाही.” पण दादासाहेबांनी आपलं ध्येय सोडलं नाही. चिकाटीने ते काम करीत होते.

चिकाटी असल्याशिवाय ध्येय पुरे होत नसते.

नटसंच सजल्यानंतर त्यांना साऱ्या सूचना देण्यात आल्या. मग शूटिंगला सुरवात झाली. त्यावेळी स्टुडीओ नव्हते. सेट तयार करणे आजच्या इतके सोपे नव्हते. जंगलाचा देखावा स्टुडीओत तयार करता येत नव्हता. दादासाहेबांना शूटींगकरिता उन्हातान्हात फिरावे लागत असे. ही सारी यातायात करताना किती कष्ट पडत असतील, याची कल्पनाच केलेली बरी. डोळ्यासमोरचे ध्येय त्यांना सतत स्फूर्ती देत होते, म्हणूनच एवढे श्रम करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली होती.

दिवसभर उन्हातान्हात शूटींग झाल्यानंतर रात्रीदेखील त्यांना विश्रांती मिळत नसे. आपल्या जवळच्या नटांना थोडी थोडी माहिती देऊन त्यांच्याच सहाय्याने फिलम जोडणे, तोडणे या क्रिया कराव्या लागत. बऱ्याच रात्रीपर्यंत त्यांचा हा कार्यक्रम चालू असे.

[illegible] ध्येयनिष्ठांना आपल्या जीवनात कष्टांचा
गुणाकार करावा लागतो आणि विश्रांतीचा भागाकार !

पण कोणीतरी हे करावच लागतं. भारतात त्या वेळेपर्यंत या व्यवसाया-करिता एवढे श्रम कोणी केलेच नव्हते. कोणी कष्ट घेतलेच नव्हते. कोणीही हा व्यवसाय केला नव्हता. म्हणूनच नव्या नवलाईने, नव्या गोष्टीच्या हव्यासाच्या ध्यासाने या साऱ्या गोष्टी चालल्या होत्या.

होता होता शेवटी मूकपट तयार झाला. ‘ राजा हरिश्चंद्र ! ’ महाराष्ट्राचा पहिला मूकपट ! भारताचाही पहिला मूकपट ! दादासाहेबांच्या आशेच्या वेलीला आलेलं पहिलं टपोरं फूल ! ध्येयाच्या यज्ञाची गोड सांगता ! केलेल्या कष्टांचं आणि भोगलेल्या यातनांचं मधुर फळ !

चित्रपट तयार झाला, पण तो दाखविणार कोठे ? सर्वांत मोठी समस्या तीच होती. अमेरिकन चित्रपटांच्या सिरीज्च्या सिरीज् दाखविल्या जात असताना आणि त्यात तुफान पैसा मिळत असताना ज्याचा बोलवाला नाही, प्रसिद्ध नटसंच नाही, जाहिरात नाही असा चित्रपट दाखविणार कोण ? तोटा सहन करणार कोण ? तरी पण,

इच्छा असली की मार्ग दिसतो।


अनेक प्रयत्न केल्यानंतर नानाभाई चित्रे या गृहस्थांनी सँढर्स्ट रोडवरील कॉरोनेशन चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित करण्याची तयारी दाखविली अशा तऱ्हेने शेवटी दादासाहेबांनी चित्रपटाच्या निर्मितीपासून ते प्रकाशनापर्यंतची सारी व्यवस्था शिताफीने हाताळली.

तो दिवस १७ मे १९१३ चा होता. सायंकाळ झाली होती. ‘ कॉरोनेशन ’ चित्रपट गृहाचे आवार माणसांनी फुलले होते. आवार स्वच्छ होते. एक मंगलमय घटिका भरत आली होती. सारे उत्सुक होते. सर भालचंद्र भाटवडेकर आले. त्यांच्याबरोबर दादासाहेब ही होते. सरस्वतीबाईही होत्या. थोड्या वेळाने मूकपट दाखविला गेला. महाराष्ट्राचा तसेच भारताचा पहिला मूकपट चंदेरी पड्यावर साकार झाला. अमूर्त स्वप्न मूर्त झाले. एक ध्येय तळमळीने पूर्ण झाले.

नंतर तेथेच समारंभ झाला. सर भालचंद्र भाटवडेकरांनी दादासाहेबांची मुक्त कंठाने स्तुती केली. श्री. आबासाहेब चिटणीस,

श्री. नाडकर्णी यांनीही त्यांची स्तुती केली. या सर्व गोष्टींनी ते भारावून गेले.

सरस्वतीबाई आनंदाने आपल्या पतीकडे पाहात होत्या. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. स्तुतीचे शब्द त्या जीवाचे कान करून ऐकत होत्या आणि ते ऐकत असताना त्यांना स्थळकाळाचेही भान राहिले नव्हते.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क. ...92675... नों. दि ..........
वि. ........ क. ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि ........

IRBK-0112745

IRBK-0112745